जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com





शहरात पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठीच्या मोठ्या सिमेंट पाईप गटारींची कामे सुरु असून कामे झालेल्या ठिकाणी उघडेच असल्याने धोकादायक ठरणारे चेंबर्स. (छाया - लहू दळवी)

# शहरातील रस्त्यांच्या कामामुळे 'नागरिक हतबल'

*(पान १ वरुन)*

त्यामुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. महापालिकेत सध्या 'प्रशासक राज' असल्याने प्रशासनावर व काम करणाऱ्या ठेकेदारांवर कोणाचाच वचक राहिलेला नसल्याने त्यांची मनमानी सुरु आहे. त्यामुळे दाद मागायची कोणाकडे? असा प्रश्न नागरिकांसमोर असून या हतबलतेमुळे नागरिकांत प्रचंड संताप व उद्विग्नता व्यक्त होत आहे.

नगर शहरात माळीवाड्यापासून ते चितळे रस्त्यापर्यंत मध्य शहरातील सर्वच रस्ते या कामांसाठी खोदून ठेवलेले आहेत. एकाच वेळी अनेक ठिकाणी कामे सुरु करण्यात आली आहेत. ही कामे नागरिकांच्या सोयीसाठीच आहेत, यात दुमत नाही, पण कोणत्याही कामाची एक कालमर्यादा असते, याचा विसर महापालिका आयुक्त तथा प्रशासक असलेल्या यशवंत डांगे आणि त्यांच्या हाताखाली कार्यरत अधिकारी, कर्मचाऱ्यांना पडलेला दिसत आहे. त्यामुळे त्यांचे या सुरु असलेल्या कामांकडे लक्ष नसावे, अशी शंका उपस्थित होत आहे.

## व्यावसायिकांवर आली उपासमारीची वेळ

शहराच्या अनेक भागात तर गेल्या ५ ते ६ महिन्यांपासून ही कामे रखडत रखडत सुरु आहेत. रस्ते खोदून ठेवलेले असल्याने त्या त्या भागातील छोटे मोठे व्यावसायिक यांचे व्यवसाय पूर्णपणे ठप्प आहेत. अनेक महिन्यांपासून सुरु असलेल्या या संथ गतीच्या कामांमुळे किराणा दुकान, दूधवाले, टायर पंक्चरवाले, फेरीवाले, रस्त्यावरील छोट्या व्यवसायिकांना ग्राहक मिळेनासे झालेत. व्यावसायिकांना आपल्या दुकानांमध्ये माल भरायचा तर त्यांच्या दुकानापर्यंत वाहन जावू शकत नाही. पाहिजे ती वस्तू उपलब्ध नसल्याने ग्राहक त्या टपरीकडे किंवा दुकानाकडे फिरकत नाहीत, त्यामुळे व्यवसाय ठप्प होवून या व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ आली असल्याची कैफियत ते व्यावसायिक मांडत आहेत.

## महापालिका प्रशासनावर कोणाचाच वचक नसल्याने सुरु आहे मनमानी

ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. नगर महापालिकेची निवडणूक न झाल्याने गेल्या २ वर्षांपासून महापालिकेवर प्रशासक आहे. महापालिकेत पदाधिकारी, नगरसेवक नसल्याने प्रशासक व अधिकारी, कर्मचारी यांना मोकळे रान मिळत आहे. त्यातूनच शहरात सध्या मनमानी पद्धतीचा कारभार सुरु आहे. अधिकारी आणि ठेकेदारांचे लागेबांधे असल्याने ठेकेदारही मोकाट आहेत. ते आपल्या लहरीनुसार कामे करत आहेत. किरकोळ कारणावरून ठेकेदाराचे कर्मचारी ८ ते १० दिवस कामाकडे फिरकत नाहीत.

नागरिकांनी रखडलेल्या कामाबाबत विचारणा करण्याचा प्रयत्न केला असता, कामगार कमी आहेत, साहित्य संपले आहे, अशी उत्तरे दिली जातात. अधिकाऱ्यांना फोन केला तर आम्ही तुमच्या सोयीसाठीच ही कामे करतोयं, थोडा दम धरा, अशी थातूरमातुर उत्तरे दिली जात आहेत. त्यामुळे दाद कोणाकडे मागायची? अधिकाऱ्यांची मनमानी आणि ठेकेदारांचा लहरीपणा याबाबत तक्रार कोणाकडे करायची, असा प्रश्न नागरिकांना पडत आहे. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका झालेल्या असल्याने तसेच महापालिकेच्या निवडणुका अजून जाहीर झालेल्या नसल्याने सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्तेही सध्या शांत असून, या प्रश्नावर बोलताना दिसत नाहीत. त्यामुळे प्रशासनाचे फावत असल्याचे चित्र सध्या तरी दिसत आहे.

# शहरातील दूषित व मैलामिश्रित पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त; स्वच्छ पुरवठा करा अन्यथा महापालिकेसमोर मटका फोड आंदोलन

नगर - शहरातील सूर्यनगर परिसरातील रहिवासी मागील ५ ते ६ महिन्यांपासून दूषित व मैलामिश्रित पाणीपुरवठ्यामुळे त्रस्त झाले आहेत. या दूषित पाण्यामुळे परिसरात उलटी, जुलाब, गॅस, कावीळ यांसारख्या आजारांनी नागरिकांना ग्रासले आहे. या गंभीर समस्येबाबत महापालिकेकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, असा आरोप रहिवाशांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर भाजपच्या माजी नगरसेविका सौ. पल्लवीताई जाधव यांच्या नेतृत्वाखाली महिलांच्या शिष्टमंडळाने महापालिकेचे उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. स्वच्छ पाणीपुरवठा लवकरात लवकर सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली. आठ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास महापालिकेसमोर मटका फोड आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.



शहरातील दूषित व मैलामिश्रित पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाल्याचे निवेदन महापालिकेला देण्यात आले.

यावेळी बोलताना पल्लवीताई जाधव म्हणाल्या, महापालिकेचा हा दुजाभाव नागरिकांच्या आरोग्यावर घातक ठरत आहे. आम्ही निवडून आलो नाही तरी जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरण्याची आमची तयारी आहे. महिलांना स्वयंपाकासाठी, पिण्यासाठी अस्वच्छ पाणी वापरावे लागते, ही लाजिरवाणी बाब आहे. जर प्रशासनाने वेळेत उपाययोजना केली नाही, तर नागरिकांसह महापालिकेसमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल आणि त्याची सर्व जबाबदारी प्रशासनावर असेल.

विशेष म्हणजे, महापालिकेने पाणीपट्टीमध्ये वाढ केली असताना नागरिकांना अस्वच्छ पाणी प्यावे लागत आहे. जोपर्यंत स्वच्छ पाणीपुरवठा होत नाही, तोपर्यंत पाणीपट्टी भरणार नाही, असा ठाम निर्णय नागरिकांनी घेतला आहे. या निवेदनप्रसंगी सौ. शिला तळेकर, सौ. सुवर्णा फुंदे, सौ. आरती खताडे, सौ. चौधरी, सौ. रूपाली शिंदे आदी महिला उपस्थित होत्या.

# शिक्षकांचे वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण प्रत्येक तालुक्यात घ्यावे

नगर - जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे वरिष्ठ व निवड श्रेणी संदर्भातील प्रशिक्षण २ ते १२ जून या कालावधीत संगमनेर येथे आयोजित करण्यात आले आहे. मात्र संगमनेर हे ठिकाण जिल्ह्यातील अनेक शिक्षकांसाठी लांब व गैरसोयीचे असून, महिला शिक्षकांचीही मोठी संख्या असल्याने प्रशिक्षणासाठी प्रवास करणे अवघड ठरेल. ही अडचण लक्षात घेऊन शिक्षक भारती संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्याकडे प्रशिक्षण केंद्र बदलण्याची मागणी केली आहे. सदर प्रशिक्षण अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील केंद्रावर घेण्यात यावे, जेणेकरून १०० पेक्षा जास्त शिक्षकांना प्रवासाची अडचण जाणवणार नाही, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात बोलताना शिक्षक भारती संघटनेचे राज्यसचिव सुनील गाडगे म्हणाले की शिक्षकांवर आधीच शैक्षणिक जबाबदाऱ्या आहेत. अशा वेळी लांबच्या ठिकाणी प्रशिक्षणासाठी पाठवणे हे शिक्षण व्यवस्थेवर ताण आणणारे आहे. विशेषतः महिला शिक्षकांना याचा फार मोठा फटका बसतो. त्यामुळे प्रशासनाने संवेदनशीलतेने विचार करून प्रशिक्षणाची जागा बदलावी. जिल्ह्यात अनेक प्रशिक्षण केंद्रे उपलब्ध असून त्यांचा योग्य वापर केल्यास शिक्षकांना सोयीचे होईल आणि प्रशिक्षणाची गुणवत्ता देखील वाढेल. वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षण प्रत्येक तालुक्यात घेण्यात यावे.

संघटनेच्या वतीने दिलेल्या निवेदनावर तातडीने कार्यवाही करून प्रशिक्षणाचे ठिकाण बदलावे, अशी मागणी सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे, जिल्हा सचिव विजय कराळे, सोमनाथ बोंतले, जिल्हा महिला अध्यक्ष आशा मगर, कार्यवाह संजय भुसारी, कैलास जाधव, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सचिन शेलार, गोरक्षनाथ गव्हाणे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिक जिल्हाध्यक्ष रामराव काळे, पुणे विभागीय कार्याध्यक्ष तथा शिक्षक भरतीचे जिल्हा सचिव महेश पाडेकर, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवने, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानितच्या राज्यअध्यक्षा रूपाली कुरूमकर आदी उपस्थित होते.

# मेडिकल दुकानातून चोरी; १.२० लाखांची रोकड पळवली

नगर - बंद मेडिकल दुकानाच्या छताचा पत्रा कशानेतरी उचकटून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. आतील ड्रॉवर मध्ये ठेवलेले १ लाख २० हजार रुपये चोरुन नेले. ही घटना नगर तालुक्यातील देहरे येथील शिवम मेडिकल या दुकानात १५ मे रोजी रात्री ९.३० ते १६ मे रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत यशवंत कचरु काळे (वय ४८, रा. देहरे ता नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे शिवम मेडिकल नावाचे दुकान असून ते दुकान त्यांनी १५ मे रोजी रात्री ९.३० वाजता नेहमीप्रमाणे बंद केले. त्यानंतर बंद दुकानाच्या छताचा पत्रा उचकाटून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. आतील सामानाची उचकापाचक करुन ड्रॉवरमध्ये ठेवलेले १ लाख २० हजार रुपये चोरुन नेले. ही घटना १६ मे रोजी सकाळी निदर्शनास आली.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात यशवंत काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध ३३१ (४) ३०५ प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक भालेराव करीत आहे.

# वरिष्ठ व निवडश्रेणीचे प्रशिक्षण उत्तर भाग व दक्षिण भाग अशा स्वरूपात घ्यावे; दूरच्या तालुक्यातील प्रशिक्षण शिक्षकांना प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत अडचणीचे

नगर - २ ते १२ जून मध्ये वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी प्रशिक्षण केंद्रात बदल करावा, अशी मागणी शिक्षक परिषदेने केलेली आहे. जर प्रशिक्षण संगमनेर येथे झाले तर त्यावर आक्षेप घेतला असून, हे ठिकाण जिल्ह्यातील अनेक शिक्षक, विशेषतः महिला शिक्षकांसाठी प्रवासाच्या दृष्टीने गैरसोयीचे असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे हे प्रशिक्षण केंद्र दुसऱ्या ठिकाणी हलवण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाने जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांच्या नेतृत्वाखाली माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांची भेट घेऊन प्रशिक्षणाच्या नियोजित ठिकाणाबाबत हरकत नोंदवली.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाने जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांच्या नेतृत्वाखाली माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांची भेट घेऊन प्रशिक्षणाच्या नियोजित ठिकाणाबाबत हरकत नोंदवली. या वेळी परिषदेच्या वतीने सादर करण्यात आलेल्या निवेदनात, संगमनेर हे ठिकाण जिल्ह्यातील अनेक शिक्षकांसाठी, विशेषतः महिला शिक्षकांसाठी, प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत अडचणीचे असल्याचा मुद्दा अधोरेखित करण्यात आला आहे

निवेदनात पुढे सांगण्यात आले की, प्रशिक्षणासाठी शिक्षकांची संख्या विचारात घेऊन, ज्या तालुक्यांमध्ये १०० पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थी आहेत, त्या ठिकाणीच प्रशिक्षण केंद्र निश्चित करावे. तसेच जिल्ह्याचे दोन विभाग - उत्तर आणि दक्षिण असे विभाजन करून अनुक्रमे संगमनेर आणि अहिल्यानगर येथे प्रशिक्षण घेण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. याप्रसंगी कोषाध्यक्ष प्रसाद सामलेटी, जिल्हा कोषाध्यक्ष बबन शिंदे, अभिजीत गवारे, दीपक आरडे, ए.बी. भोगे, दिपक शिरसाठ आदी उपस्थित होते.

शिक्षक परिषदेच्या निवेदनानुसार, प्रशिक्षण केंद्र ठरवताना केवळ प्रशासनाच्या सोयीऐवजी, प्रत्यक्ष प्रशिक्षणार्थी असलेल्या शिक्षकांच्या सोयीचा विचार केला जावा. विशेषतः ग्रामीण भागातील महिला शिक्षकांना संगमनेरला ये-जा करताना होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी पर्यायी ठिकाण निश्चित करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# १०० दिवशीय कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात कोतवाली पोलीस ठाण्याचा जिल्ह्यात द्वितीय क्रमांक

नगर- राज्याच्या सर्व ३५८ तालुक्यातील १० हजार शासकीय कार्यालयांनी शंभर दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यामध्ये कोतवाली पोलीस ठाण्याचा द्वितीय तर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय संगमनेर यांचा प्रथम क्रमांक जाहीर झाला. ही निवड झाल्याबद्दल कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे व पोलीस उपअधीक्षक कुणाल सोनवणे (संगमनेर) यांचे राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले

सर्व शासकीय विभागांच्या प्रत्येक महसूली विभागातील उत्कृष्ट तीन तालुका कार्यालयांची निवड जाहीर झाली.पोलीस ठाण्यात वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोईसुविधा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी १० मुद्यांवर या सर्वच तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांनी चांगली कामगिरी केली आहे. कोतवाली पोलीस ठाण्यास मिळालेल्या यशामुळे पोलीस उप अधीक्षक अमोल भारती यांनी पोलीस निरीक्षक दराडे यांचे अभिनंदन केले.

# मुकुंदनगर येथील कत्तलखान्यावर छापा; २४० किलो गोमांस पकडले

नगर - गोवंशीय जनावरांची कत्तल करुन गोमांस विक्री करणाऱ्या कत्तलखान्यावर भिंगार कॅम्प पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत एकास ताब्यात घेऊन त्याच्याकडून २४० किलो गोमांसासह ६२ हजार २०० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई मुकुंद नगर येथील अमर कॉम्प्लेक्स येथे १६ मे रोजी सकाळी नऊ वाजता केली.

याबाबतची माहिती अशी की भिंगार कॅम्प पोलिसांना मिळालेल्या माहितीवरुन पोलिसांनी मुकुंदनगर येथील अमर कॉम्प्लेक्स मधील गाळ्यामध्ये सुरु असलेल्या कत्तलखान्यावर छापा टाकून शब्बीर कासम कुरेशी (वय ५७, रा. सुभेदार गल्ली, झेंडिगेट) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून ६० हजार रुपये किमतीचे २४० किलो गोमांस, २ हजार रुपये किमतीचा इलेक्ट्रिक वजन काटा,२०० रुपये किमतीचा एक लोखंडी सत्तूर, व एक लहान चाकू असा ६२ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार दीपक शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शब्बीर कुरेशी याच्याविरुद्ध बी. एन. एस. कलम २७१ सह महाराष्ट्र पशु संरक्षण सुधारणा अधिनियम २०१५ चे कलम ५ (क) ९ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
"मुसाफिर"-९८२२०२०६९१



## श्रेष्ठ साहित्यिक लेखक श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

मनुष्यमात्राच्या सुखप्राप्तीरूप अंतिम ध्येयाच्या स्वरूप निश्चयाशी ज्ञानाचा, कर्माचा निकट संबंध असतो. त्या ध्येयाच्या साधनांशीही त्यांचा निकट संबंध दिसून येईल.

सुखाचे उगम बेथेम या इंग्र ग्रंथकाराच्या मते आरोग्य, संपत्ती, विषयोपभोग, कर्म, मैत्री, किर्ती, सत्ता, धर्मनिष्ठा, सदिच्छापूर्ती, अपकारेच्छापूर्ती, ज्ञान, स्मृती, कल्पना (हिच्यात सौंदर्यबुद्धीचाही समावेश), आशा, विचारसंगती, दुःखमुक्तता असे अनेक आहेत.

त्यापैकी काही बव्हंशी शारीरिक श्रमाने व इतर प्रमुखत्वेवरून मानसिक श्रमाने साध्या होण्यासारखे असतात. उदाहरणार्थ, विषय साधने, सत्ता, कर्मकौशल्ये ही प्राप्त करून घेण्यासाठी बुद्धीस व मनासमोर कल्पनाचित्रे उभी करण्याकरिता कल्पनेस शीण द्यावा लागतो.

शारीरिक किंवा मानसिक व्यवसाय उत्तमतेने होण्याकरिता त्या व्यवसायास लागणाऱ्या साधनांचे पूर्ण ज्ञान अन् त्यावर पूर्ण विश्वास असावा लागतो.

उद्दिष्ट प्राप्तीबद्दल तीव्र आतुरता व एकाग्रता ही व्यवसायाची इतर अंगेही असावी लागतात. मनाचे ठायी एकाग्रतेची शक्ती अभ्यासानेच आणावी लागते.

सुखाच्या साधनांशीही ज्ञान व कर्म यांचा जिव्हाळ्याचा संबंध असतो. ज्ञानात सत्य व कर्मात कर्तव्य जसे श्रेष्ठ तसे सुखाच्या उगमात सौंदर्य श्रेष्ठ असते.

प्रसिद्ध जर्मन कवी गटे याचे ब्रीदवाक्य 'सत्य, कर्तव्य व सौंदर्य' असून, त्यात मनुष्याचा बौद्धिक, नैतिक व भावनात्मक ध्येयांचे सार आले आहे. सत्य म्हणजे वस्तुस्थिती - विचारात्मक मानसिक व्यवसाय आणि कर्तव्य म्हणजे व्यवसायाचा सुखाशी व सौंदर्य म्हणजे वस्तुस्थिती व कल्पनासृष्टीचा मेळ होय. या तिन्ही मेळांमध्ये अर्थात कल्पना, वस्तू, व्यवसाय व सुख यामध्ये पूर्ण मेळ राहणे मानवी पूर्णावस्थेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. (प्रसिद्ध व शतकापूर्वीच साहित्यिक श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या 'सुदाम्याचे पोहे' पुस्तकाच्या प्रस्तावनेतून)

# घरासमोरून मोटारसायकलची चोरी

नगर - घरासमोर रस्त्याच्या कडेला हँडल लॉक करून लावलेली होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल (क्र.एम एच १६ सी एस ५८ २३) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना सावेडी परिसरातील कसबे वस्ती जवळील जयभवानी नगर येथील जगदंबा रो. हाऊसिंग सोसायटी येथे १३ मे रोजी रात्री घडली.

या प्रकरणी भाऊसाहेब सूर्यभान काळदाते (वय ४३, रा. जगदंबा रो हाऊसिंग सोसायटी जयभवानी नगर कसबेवस्ती सावेडी अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार भानुदास खेडकर हे करीत आहे.

# विशाल रघुवंशी यांचे हृदयविकाराने निधन



नगर - येथील पंचवटीनगर भिस्तबाग येथील रहिवासी विशाल रविंद्र रघुवंशी (वय ४०) यांचे १६ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, १ भाऊ असा परिवार आहे. आशिष रघुवंशी यांचे ते बंधू होत.

# रजनी (बेबीताई) रासने यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील रजनी (बेबीताई) भाऊसाहेब रासने (वय ८८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे, पतवंडे, नातसून असा परिवार आहे. रमेश मार्केट येथील निराली ब्युटि पॅलेसचे मालक महेश रासने यांच्या मातोश्री, पेंटिंग कॉन्ट्रॅक्टर गौरव रासने यांच्या त्या आजी होत.

# एकनाथ पवार यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - गुंडेगाव येथील जुन्या पिढीतील दगडी बांधकाम करणारे एकनाथ नारायण पवार (वय ७५) यांचे १६ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर गुंडेगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ४ मुले, ४ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# शिवाजीराव गोडसे ईनामदार यांचे निधन



पुणे - गुरुवार पेठ पुणे येथील रहिवासी शिवाजीराव गोडसे ईनामदार (वय ९२) यांचे वृद्धापकाळाने पुणे येथे १६ मे रोजी निधन झाले. त्यांच्यावर पुणे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. लोकमतचे पत्रकार राजू ईनामदार यांचे ते वडील होत.

# गृहिणी

## आरोग्य

### असे जपा डोळ्यांना...

डोळ्यांचे आरोग्य म्हणजे डोळ्यांची काळजी घेणे आणि त्यांची दृष्टी चांगली ठेवणे. डोळ्यांच्या आरोग्यासाठी योग्य आहार, नियमित व्यायाम आणि डोळ्यांची स्वच्छता अत्यंत आवश्यक आहे. डोळ्यांसाठी व्हिटॅमिन ए, सी, ई, आणि बी असलेले पदार्थ खावे. ओमेगा-३ फॅटी सिड असलेले मासे खावे. गाजर, ब्रोकोली, पालक, लिंबूवर्गीय फळे, आणि नट्सचा यांचा आहारात समावेश करावा. त्याचप्रमाणे डोळ्यांचे व्यायाम करा, जसे की डोळे उघडणे आणि मिटवणे, आणि डोळे फिरवणे. स्क्रीनवर काम करत असल्यास, दर २० मिनिटांनी ब्रेक घ्या आणि डोळ्यांना आराम द्या. डोळ्यांवर जास्त मेकअप केल्याने डोळ्यांची समस्या येऊ शकते. डोळ्यांना स्वच्छ पाण्याने धुतल्याने डोळ्यांमध्ये असलेला कचरा निघून जातो. तसेच डोळ्यांना योग्य चष्मा वापरल्याने डोळ्यांवर ताण कमी होतो.

## पाककला

### पातळ पोह्यांचे भजे

**साहित्य :** २ मुठी पातळ पोहे, २ चमचे बेसन, १ बारिक चिरलेला कांदा, बारिक चीरलेली मिरची, लाल तिखट चवीनुसार, हळद, मीठ, कोथींबीर, चीमुटभर ओवा, तेल तळण्यासाठी

**कृती :** एका भांड्यात पोहे, कांदा, कोथींबीर, मिरची, ओवा हे सर्व थोड पाणी घालून भिजवुन घ्या नंतर त्यात लाल तिखट, हळद, तीळ, मीठ घालुन पुन्हा छान मीक्स करुन घ्या व वरुन २ चमचे बेसन घाला व थोड पाणी घालून पीठ भीजवुन घ्या. तयार पिठाचेछोटे-छोटे भजी गरम तेलात सोडून बारिक गॅसवर तळून घ्या. तेल छान कड कडीत गरम असावे आणि भजी सोडणार तेव्हा गॅस फुल असावा भजी पलटी करुन झाली की मंद आचेवर तळून घ्यावीत. गरमा गरम कुरकुरीत भजी तयार झाली.

## वास्तू

### घरात ठेवा मोरपंख

घरात मोराचे पंख ठेवणे शुभ मानले जाते, खासकरून पूर्व दिशेला. मोराचे पंख घरात सकारात्मक ऊर्जा आणतात आणि नकारात्मक ऊर्जा दूर करतात. मोराचे पंख घरात सकारात्मक ऊर्जा वाढवतात, ज्यामुळे घरातील वातावरण आनंदी आणि शांत होते. त्याचप्रमाणे मोराचे पंख आर्थिक प्रगतीसाठी देखील शुभ मानले जातात. ज्यांच्या कुंडलीत राहु दोष आहे त्यांनी उत्तर-पश्चिम दिशेला मोराचे पंख ठेवल्यास राहु दोष कमी होतो. मुलांच्या अभ्यासाच्या खोलीत मोराचे पंख ठेवल्यास बुद्धिमत्ता आणि स्मरणशक्ती वाढते. पूजेच्या ठिकाणी मोराचे पंख ठेवल्यास घरात सकारात्मक ऊर्जा टिकून राहते.

## सल्ला

कंगवा स्वच्छ करण्यासाठी शॅम्पूचा वापर करावा. यासाठी पाण्यामध्ये शॅम्पू मिक्स करून घ्या. त्यानंतर कंगवा शॅम्पूच्या पाण्यात १० मिनिटं तसाच भिजत ठेवा. नंतर ब्रशच्या सहाय्याने घासून व्यवस्थित स्वच्छ करून घ्या. नंतर पुन्हा एकदा पाण्याचा वापर करून कंगवा स्वच्छ करा.

## सौंदर्य

केसांवरील मेंदीचा (हेन्ना) लाल रंग कमी करण्यासाठी, तुम्ही दही आणि बेकिंग पावडर (बेकिंग सोडा) सम प्रमाणात मिसळून पेस्ट बनवू शकता आणि ती केसांवर लावू शकता. लिंबाचा रस आणि मध देखील यासाठी प्रभावी ठरतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १८ मे २०२५

**--, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, उ.षा.१८।५३, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. येणारा काळ भूतकाळातील आनंद पुन्हा आणेल.

**वृषभ :** आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयर संदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता. जिभेला सुखावणारा दिवस असेल.

**मिथुन :** यथायोग्य विचार करून कार्य कराल. मनोरंजनावर खर्च होईल. व्यापार-व्यवसायात प्रगती होईल. एखाद्या ओळखीच्या व्यक्तीबरोबर आपले सामंजस्य वाढेल.

**कर्क :** निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. व्यापार व्यवसायात वेळ साधारण राहील. शीघ्र अनुकूल परिस्थिती होईल. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. स्त्री पक्षाकडून सहयोग मिळेल.

**सिंह :** आजचा दिवस आपल्या योजनेंसाठी आणि सहकार्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी निर्णायक ठरेल. तरुणांना नोकरीविषयक मुलाखतीतून यश.

**कन्या :** अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध कराल. आपल्या कार्यक्षेत्रातील एखाद्या कल्पक सर्जनशील कार्यात प्रगति होईल.

**तूळ :** आर्थिक बाबतीत उन्नती होईल. आपल्या आत्मविश्वासाचे, जोखीम घेण्याच्या वृत्तीचे वरिष्ठांकडून कौतुक होईल.

**वृश्चिक :** सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळल्याने तोटा. बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते.

**धनु :** हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो. कोणाला संताप येईल कोणी दुखावले जाईल असे काही बोलाल आणि वादात सापडाल.


**मकर :** आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील. इतर योजना आणि उपक्रम नेहमीसारखेच चालू राहतील. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**कुंभ :** आपणास गरज असेल तेव्हा कुटुंबियांचे सहकार्य मिळेल. घराच्या विषयांमध्ये वेळ उत्तम. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील.

**मीन :** आपल्याकडे जे काही चांगले विचार आहेत ज्यांना इतरांपर्यंत पोहोचवाल. मित्र आनंद देतील. महत्त्वाची सरकार दरबारी कामे पूर्ण होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१७९ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१७८ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) समाधान; तृप्ती ३) कामधंदा नसलेला ५) थाटमाट; शानशोक ७) छोटा; सान; लघू ९) कमी वेळेत; जलदी १०) डोळा; नेत्र; चक्षू; अक्ष ११) सारखा; समान; बरोबर १४) इस्लाम धर्माची व्यक्ती १६) मस्ती; जोर १८) आकाश; गगन; अंबर २०) गावात राहणारी व्यक्ती किंवा लोक २१) गळण्याची प्रक्रिया

**उभे शब्द :-** १) गोळा करणे; जमविणे २) सहा तोंडाचा; गणपतीचा मोठा भाऊ ३) डोलदार नसलेला; बेढब ४) भोजनातील एक आवश्यक घटक ६) कालच्या आदला किंवा उद्याच्या नंतरचा दिवस ८) धिंगामस्ती; गोंधळ; गलबला ११) पूर्ण भरतीची वेळ १२) ध्यान; चिंतन १३) शीण; ग्लानी; थकवा १४) पोरगा; छोकरा १५) मुरड; चमक; उसण १७) गणना; मोजणी; माप १९) केस दोन बाजूंस विभागल्यावर त्यामध्ये पडणारी रेषा; एक अंमली पदार्थ

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** आपले डोळे तेच लोक उघडतात, ज्यांच्यावर आपण डोळे बंद करुन विश्वास ठेवतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### हवेला वजन असते काय?

या प्रश्नाला चटकन नकारार्थी उत्तर द्यायचा आपल्याला मोह होतो. हवा हे अनेक प्रकारच्या रेणूंचे मिश्रण असते. हवेत अनेक पदार्थ वायुरूप स्थितीत वावरत असतात. सर्वच रेणूंना वजन असते. यामुळे हवेलाही वजन असणे साहजिक आहे.

हे सिद्ध करायला एक छोटा प्रयोग करून बघता येईल. एक फुगा घ्यायचा. तो तराजूत टाकायचा. दुसऱ्या तागड्यात त्याच्या वजनाइतके वजन टाकायचे. नंतर फुंकून फुगा भरायचा नि त्याचे तोंड गाठ मारून ते बंद करायचे; हा फुगा पुन्हा त्याच्या तागडीत टाकायचा. लगेच फुग्याचे पारडे जड झालेले आढळून येईल. याचाच अर्थ हवेला वजन असते.

हवेला वजन असल्यामुळे वातावरणाचा दाब हा शास्त्रीयदृष्ट्या एक महत्त्वाचे वास्तवशास्त्रीय अंग ठरते.

आपण समुद्रसपाटीच्या जवळ राहतो. इथे पाणी १०० अंश से. ला उकळते; याउलट हिमालयात उंचावरच्या ठिकाणी हवेचा दाब कमी झाल्यावर हे पाणी खूपच आधी उकळते.

### अस्वलाचा ढोंगीपणा

असे सांगतात की, अस्वल मनुष्याच्या प्रेतास शिवत नाही. एके दिवशी एक अस्वल म्हणाले, 'मनुष्यजातीसंबंधाने माझी इतकी आदरबुध्दी आहे की, मला जरी कोणी पृथ्वीचे राज्य देऊ केले, तरी मनुष्याच्या प्रेतास मी कधी धक्का लावणार नाही.'

हे ऐकून कोल्हा त्यास म्हणतो, 'अरे, तू म्हणतोस ते कदाचित खरे असेल, पण मनुष्याच्या प्रेताची तुला जशी दया येते, तशीच जर मनुष्याची येईल, तर तुझ्या या बढाईत काही तरी अर्थ आहे, असे मी समजेन.'

तात्पर्य : ज्या वस्तूचा उपयोग करून घेता येणे आपणास शक्य नाही, त्या वस्तूसंबंधाने आपण अगदी निरपेक्ष आहोत, असे भासविण्याचा प्रयत्न करणे हा केवळ ढोंगीपणा होय.

## रहमते दर्शन (भाग - १)



### असीम उपकार

मेरा विवाह सन् १९७७ में एक ऐसे परिवार में हुआ जो कि महाराज कृपालसिंह जी का नाम लेवा था । मेरी पत्नी उषा मदान को १२ वर्ष की आयु में ही महाराज कृपालसिंह जी ने नामदान से नवाज़ा तथा उनके घर शाहदरा में सत्संग भी किया । महाराज दर्शनसिंह जी का दीदार मुझे १९७६ में हुआ और मैंने सत्संगों में जाना शुरू कर दिया। इसके पश्चात मैं उनकी ओर खिंचता ही चला गया। सन् १९८२ में मेरे जीवन में एक ऐसी घटना घटी जिससे मुझे यह यक़ीन को गया कि संत दर्शनसिंह जी महाराज मानव चोले में स्वयं ईश्वर हैं। जीवन दान देना उनकी एक निगाह की बात थी । बात ऐसे हुई कि सन् १९८२ में मुझे बुखार हुआ । मैंने ऐलोपैथिक, आयुर्वेदिक तथा होम्योपैथी इलाज किये, लेकिन बुख़ार उतरता ही नहीं था। शरीर ऐसे हो गया कि जैसे उसमें जान ही नहीं हो । बुख़ार का तो नाम था, असलियत यह थी कि कोई अज्ञात शक्ति मेरी बाजुओं और शरीर पर लोहे के सरियों से प्रहार करती और मैं निढाल हो जाता। पड़ोसियो ने गुरुद्वारे से भाई जी को बुलावाया । उन्होंने भी यही बताया कि कोई अज्ञात शक्ति परेशान कर रही है। उन्होंने काफी मेहनत की, ३ दिन तक रोज़ झाड़ा दिया, लेकिन तीसरे दिन उन्होंने कहा कि यह उनके बस की बात नहीं है। मेरी हालत इतनी

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### विशुद्ध ऊर्जा चक्र

इस उर्जा चक्र को कंठ चक्र भी कहते हैं। विशुद्ध चक्र गले के में कंठ वाली जगह पर स्थित है। मेरुदंड की सीमा इस चक्र से मूल समाप्त हो जाती है। यह परम शक्तिशाली योग चक्र अनंत शक्तियों से परिपूर्ण है। यह उर्जा चक्र आकाश तत्व से जुड़ा हुआ है। ये चक्र थायराइड ग्रंथि के द्वारा हारमोन पैदा करता है। थायराइड ग्रंथि का दांतो के विकास और मानसिक विकास में महत्वपूर्ण योगदान है। यह ग्रंथि शरीर में आक्सीजन का संतुलन बनाये रखती है तथा कार्बनडायअकसाइड के निकालने का मार्ग प्रशस्त करती है।

शरीर का वजन बढ़ना, सूजन आ जाना, शिथिलता, हृदय का तेजी से धड़कना तथा त्वचा में रूखापन आदि आने लगता है जिस का कारण यह है कि थायराइड ग्रंथी का संतुलन बिगडा हुआ है। इस चक्र पर नीले रंग का प्रकाश टिमटिमाता रहता है। यह चक्र सीधे अवचेतन मन को प्रभावित करता है। यह चक्र मस्तिष्क के साइलेंट क्षेत्र को जागृत करता है। यहां १६ नाड़ीयां मिलती हैं जिनसे प्रकाश निकलता रहता है जो कि एक कमल के फूल की तरह दिखता है। इस चक्र पर में ध्यान लगाने से वाक सिद्धि मिल जाती है। व्यक्ति की जुबान मिठास आ जाती है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'करोडपतीचा मुलगा...'

सायंकाळी सहा वाजेदरम्यान ऑफिसम धुन निघालो. गेटच्या बाहेर गाडीवर येताच एका वृध्दव्यक्तीने मला थांबवलं. त्यांच्यासोबत साधारण ८ ते १० वर्षांचा एक मुलगा व एक मुलगी होती. म्हणाला, एसटीत माझं पाकिट मारलंय. घरी जायला पैसे नाहीत. कृपा करुन दोनशे रुपये द्या. घरी गेल्यावर तुम्हाला मुलाकडुन पैसे पाठविन. मी दोनशे रुपये दिले. म्हणालो, तुमची वेळ महत्वाची आहे. पैसे पाठवु नका. त्या बाबांच्या चेहऱ्यावरचा आनंद मनात साठवुन मी निघालो. काही अंतरावर येताच खिशातल्या मोबाईलने स्वतःचं अस्तित्व सिध्द केलं. रस्त्याकडेला गाडी थांबवली. माझ्याकडे सेव्ह नसलेला नंबर स्क्रिनवर दिसला. कॉल स्वीकारला. पलिकडच्या व्यक्तीने नमस्कार म्हणत नाव सांगितलं. क्षणभर मला काहीच सुचलं नाही. ती व्यक्ती म्हणाली, मला तुमची फार गरज आहे. माझा पी. ए. तुमच्या लेखनाविषयी सांगत असतो. तुम्ही सांगाल त्या दिवशीच्या माझ्या सगळ्या अपॉईंटमेंट रद्द करतो पण तुम्ही मला येऊन भेटाच. मी त्यांना म्हणालो पुढचा रविवार मी माझ्यासाठी राखीव ठेवला होता. पण तो तुमच्यासाठी ठेवतो. पलिकडची व्यक्ती म्हणाली, तुम्हाला घेण्यासाठी गाडी पाठवतो. मी नम्रपणे नकार दिला. माझ्या गाडीवर येतो मी. पुन्हा त्या व्यक्तीने विनंती केली नक्की याच. तुम्हीच माझं काम करु शकता. हो म्हणून मी फोन बंद केला. थोडा वेळ तसाच थांबलो. ह्या धनाढ्य व्यक्तीचं काय काम असेल माझ्याकडे? मी विचार करु लागलो. उत्तर काही मिळेना. पण त्यांचं काम शक्य असेल तर नक्कीच करणार असं मनात ठरवुन मी निघालो. घरी आलो. रात्री झोपण्यापूर्वीही त्या व्यक्तीचं नेमकं काय काम असेल ह्याविषयीचा विचार मनात आला. उत्तर मिळेना.

रविवारी मी सांगितलेल्या वेळेच्या दहा मिनिटे आधी भव्य दिव्य वास्तुजवळ आलो. वॉचमनने गेटवर नोंद केली. स्वप्नातही वाटलं नव्हतं ही भव्य दिव्य वास्तु आतुन पाहायला मिळेल. उद्योगपतीने हस्तांदोलन करुन, बुके देऊन माझं स्वागत केलं. नोकराने पाणी आणुन दिलं. काय घेणार? उद्योगपतीने विचारणा केली. मी म्हणालो, दूध काही मिनिटांतच दोघांसाठी दूध आलं. मनमोहन सुंदर, अत्यंत फ्रेश वाटणारी भिंतीवरील रंगसंगती, गालिचा, प्रत्येक वस्तु नीटनेटकी ठेवलेली, कम ालीचा स्वच्छ हॉल. खूप छान लिहिता तुम्ही. ते म्हणाले. मी म्हणालो, तुमच्यासारखे प्रोत्साहन देणारे आहेत म्हणून अधिकाधिक लिहु शकतो. अवांतर बोलणं झालं. त्यांच्याविषयी त्यांनी सांगितलं. मी, त्यांच्या जागी जाऊन विचार केला. मी नेमकं काय केलं असतं ते सांगितलं. एक बाप म्हणून, तुम्ही सांगताय हे मी करणं शक्य होईल असं वाटत नाही. मी म्हणालो, ह्याला कारण तुमचं पुत्रप्रेम. तुम्ही जे करणार आहात ते मुलाचं वाईट व्हावं म्हणून करणार नाहीत हे लक्षात घ्या. अतिलाडाने अपत्य बिघडणार असेल, आळशी होणार असेल तर काहीच उपयोग नाही. तुम्ही तसं केलं नाहीतर तो अधिकाधिक आळशी होईल, बसुन खायला मिळतं म्हंटलं की कष्टाचं मूल्य समजणार कसं? तुमच्या कृतीमागचा हेतू लक्षात घ्या. ह्याक्षणी हे सांगितलेलं तुम्हाला चुकीचं वाटतंय हे मी समजु शकतो पण भविष्याचा विचार कराच. त्यांच्या मुलाला त्यांनी हॉलमध्ये बोलवलं. मुलगा आला. मुलाचा चेहरा फ्रेश दिसत नव्हता. मी, मुलाला विचारलं, भुक लागल्यावर पोळी, भाजी ऐवजी गहु आणि न शिजवलेली भाजी खातो का ? तो नाही म्हणाला. आश्चर्याने त्याने माझ्या बघितलं. उद्योगपती म्हणाले, लवकरंच तुला ह्यांच्या बोलण्याचा अर्थ कळेल. मुलाचा प्रश्नांकित चेहरा. मी निघालो. मुलगा आत गेला. मी म्हणालो, हेतु शुध्द असेल तर कृतीसुध्दा शुध्दच असते. मी सांगितलं तसं कराच. हात जोडुन मी निघालो.

पंधरी दिवसांनंतर त्यांचा फोन आला. म्हणाले, तुम्ही सांगितल्यानुसार केलं. तुम्ही जाताच मी, माझ्या वकिलाला बोलावुन घेतलं. मुलालाही बोलावलं. त्याला सांगितलं तू, आत्ताच्या आत्ता घराबाहेर व्हायचस. मी जेवढं कमावलं आहे ते सगळं एका अनाथालयाला दान करणार आहे. तुला छदामही देणार नाही. बापाच्या जीवावर जगणारे स्वतःची प्रगती कधीच करु शकत नाहीत. लगेच नोकरांना बोलावलं. दरम्यान वकिल आले. त्यांना सांगितलं. मी, ह्या वास्तुसहित सगळं दान करतो आहे. नोकरांना सांगितलं मुलाला गेटच्या बाहेर सोडा. गेटला आतुन कुलुप लाऊन घ्या. नोकरांनी तसं कले. मुलगा मोठमोठ्याने रडत होता. गेटजवळ बसुन होता. दोन दिवस गेटजवळच होता. मी सीसीटिव्हीत त्याला पाहात होतो. गेटवरच्या वॉचमनकडुन पैसे घेऊन तो दोन-तीन वेळा जेऊन आला. त्याच्याजवळचा फोनसुध्दा मी काढुन घेतला होता. त्याची चुक त्याला कळाल्याचं वॉचमनच्या फोनवरुन मला त्याने सांगितलं. आळस झटकुन म झ्या व्यवसायात सहकार्य करण्याचं त्याने सांगितलं. मी स्वतः त्याला घरात घेतलं. तुमच्यामुळं माझा मुलगा सुधारला. धन्यवाद. भविष्यात, अर्ध्या रात्री मला आवाज द्या. मी तुमच्यासाठी नक्कीच येईल. मला खूप आनंद झाला.

(लेख क्र.५५०)

– **सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

प्रेयसी : तू म्हणालास की माझा करोडोंचा व्यवसाय आहे.
प्रियकर : मी जे म्हणालो ते करोडोंबद्दल नाही पकोड्यांबद्दल आहे

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आशिया खंडातील सर्वात कमी लोकसंख्येचा देश कोणता?

– मालदीव

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### डॉक्टर, मला बाळ हवंय!

परंतु हार्मोन्सचे प्रमाण असंतुलित झाल्यामुळे मासिक पाळी अनियमित होते. बीजनिर्मिती होतच नाही. स्त्रीबीजकोषाला सूज येते व छोटे बीज तयार होते. त्यामुळे गर्भधारणा होत नाही. पुरुषांच्या टेस्टीजमध्ये दोष असेल तर जननेंद्रियाची वाढ होत नाही. शुक्रजंतू अजिबात तयार होत नाहीत किंवा अल्प प्रमाणात तयार होतात किंवा शुक्रजंतूची हालचाल मंद असते. इंद्रियाला ताठरता येत नाही. पुरुषांमधील पौरूषत्व या हार्मोन्सवर अवलंबून असते.

**२) प्रजनन संस्थेतील विकृती :** स्त्रियांचा योनिमार्ग, गर्भाशयमुख, गर्भाशयाचा आकार, बीजवाहिनी नलिका, स्त्रीबीजकोष हे प्राकृत अवस्थेत असायला हवे. पुरुषांमध्ये वृषणग्रंथी, वृषणकोषांनी शुक्रजंतू तयार करणे ही अवस्था प्राकृत असणे आवश्यक असते. यापैकी कोणत्याही अवयवात विकृती असेल तर गर्भधारणा होत नाही.

**२) दुय्यम वंध्यत्व** (Secondary Infertility) : एकदा गर्भधारणा झाल्यानंतर काही कारणास्तव अपत्य प्राप्ती न होणे याला दुय्यम वंध्यत्व असे म्हणतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# अहिल्यानगरमधील बिल्डींगचा बदलता कल – बहुमजली इमारती – कल्पनापासून ते पूर्णत्वापर्यंत

नमस्कार मित्रांनो, आपण या लेखात नगरमध्ये उभ्या राहणाऱ्या उंच उंच ईमारती (हाय राइज बिल्डींग) बद्दल जाणून घेणार आहोत.

आपण मागील दोन तीन वर्षात इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रात व बिल्डींग क्षेत्रात बरेचसे बदल झालेले पाहत आणि अनुभवत आहोत. यु डी सी पी आर नियमावलीमध्ये बदल झाल्याने व यासाठी चालना मिळाल्याने महाराष्ट्रात फक्त पुणे, मुंबई आणि ठाण्यासारख्या ठिकाणी दिसणाऱ्या बहु मजली इमारती आपल्याला अहिल्यानगरमध्ये आकार घेताना दिसत आहेत. नगरमध्ये एकवीस मजली इमारतीसही बांधकाम परवानगी मिळायला सुरुवात झाली आहे. आपल्यातील अनेक व्यावसायिकांच्या जागा मोक्याच्या ठिकाणी आहेत तर काहींच्या जागेमध्ये जुने घर अथवा वाड्यांचे बांधकाम आहे. अश्या जुने घर अथवा वाड्यांचे बांधकाम असलेल्या ठिकाणी बहुमजली इमारतीची कल्पना प्रत्यक्षात साकारू शकते. परंतु अनेकांना हाय राइज बिल्डींग बांधणे यासाठी मनात भीती असते, प्रश्न असतो कि मोक्याच्या जागी किंवा गजबजलेल्या जागेवर इमारत बांधून पूर्ण कशी करायची? या लेखामध्ये याविषयी महत्वाचे मुद्दे मी मांडत आहे.









| Classification | Floor | Height (m) |
|---|---|---|
| Low-rise building | 1–3 | ≤9 |
| Multi-story building | 4–6 | 9–21 |
| Middle-rise building | 7–9 | 21–30 |
| Small high-rise building | 10–16 | 30–50 |
| High-rise building | 17–40 | 50–100 |
| Ultra-high-rise building | >40 | >100 |

**१) सर्वप्रथम अनुभवी आणि या क्षेत्रातील उच्च शिक्षित इंजीनिअरची नेमणूक करणे :** महापालिकेतून अथवा तत्सम विभागातून बांधकाम मंजुरी मिळाली, आर्किटेक्टने त्यांचे सर्व वर्किंग प्लान आणि आर सी सी डिझायनरने आर सी सी डिझाइन दिले, कि आपण बहुमजली इमारतीच्या बांधकामास सुरुवात करू शकतो. परंतु या पिक्चरमध्ये हिरोचे काम करण्यास लागतो एक अनुभवी आणि या क्षेत्रातील शिक्षित इंजीनिअर जो शेवटपर्यंत आपल्या ज्ञानाचा कस लावून हे काम यशस्वीपणे पूर्ण करण्यास जबाबदार असतो. सदर बांधकाम करण्यास इंजीनिअर योग्य प्रकारे पडताळणी करून ठेकेदार यांची काम करण्यास निवड करतो कि ज्याचा अनुभव ही एक समक्ष इमारतीच्या बांधकामात मोलाचा सहभाग नोंदवते. ठेकेदारांची मजुरी देताना कमी रेट देऊन पैसे वाचवण्यासाठी चुकीच्या ठेकेदाराची नेमणूक केल्यास सदर चूक इमारतीचे काम दिशाहीन पद्धतीने जाण्यास जबाबदार ठरून त्याचा त्रास विकसक अथवा जागामालक यांना शेवटपर्यंत सोसावा लागतो.

**२) बिल्डिंग बांधताना घ्यावयाची महत्वाची काळजी :–** हाय राईज इमारतीची उंची साधारण ८० फुट व त्यापेक्षा जास्त असते. यामध्ये काम करत असताना महापालिका हद्दीतील नियमाप्रमाणे आपण साईड मार्जिन सोडले आहे का ? आपल्या इमारतीमुळे शेजारच्या बिल्डींगला धोका निर्माण होतो आहे का ? या गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी आपण चारही बाजूने वेगळी परास बांधून ग्रीन नेट बांधणे आवश्यक आहे जेणेकरून सिमेंट आणि इतर धुळीचा इतरांना त्रास होणार नाही. प्रत्येक २० फुट अंतरावर बिल्डींगच्या स्लॅब बाहेर १० फुट सेफ्टी नेट बांधणे आवश्यक आहे, ज्यामुळे काम चालू असताना वरून काही बांधकाम साहित्य खाली पडून कोणाला इजा होणार नाही. बांधकाम करत असताना कामासाठी लागणारे साहित्य जमा करण्याची जागा अशी असावी जेणेकरून इतरांना अथवा शेजाऱ्यांना त्याचा त्रास होणार नाही. इमारतीमध्ये कुठलेही काम करत असताना काम करणाऱ्या सर्व प्रकारच्या कामागारांची सुरक्षितता करार सदर ठेकेदाराने करून घेणे विकसक यांनी बंधनकारक करावे. तसेच काम करताना सेफ्टी साहित्य जसे कि हेल्मेट, सेफ्टी जॅकेट, सेफ्टी श्युज, सेफ्टी बेल्ट, सेफ्टी रोप अश्या सर्व साहित्यांचा वापर केल्याशिवाय काम करण्यास परवानगी दिली जाऊ नये. यासाठी एक सेफ्टी इंजीनिअर सुपरवायजर साईटवर असणे आवश्यक आहे. साईटवर काम पूर्ण होईपर्यंत एक इलेक्ट्रिशीयन टीम आणि एक प्लंबिंग टीम असणे गरजेचे आहे.

**३) हाय राईज इमारतीमध्ये फायर फायटिंग सिस्टीमची गरज :–** हाय राईज इमारतीचे काम करताना फायर फायटिंग सिस्टीम बसवणे आणि ती योग्य पद्धतीने कार्यान्वित आहे कि नाही, याची वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी एक अनुभवी एजन्सी नियुक्त करणे, इंजीनिअरच्या माध्यमातून काम करून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक क्षमतेची पाण्याची टाकी टेरेसवर नेहमी भरलेली असावी. प्रत्येक मजल्यावर त्याचे कनेक्शन दिलेले असावे आणि फायर फायटिंग सिस्टीमचे वेळोवेळी थर्ड पार्टी ऑडीट करून घेणे आवश्यक आहे.

**४) हाय राईज इमारतीसाठी (एम इ पी) कन्सल्टंटची नेमणूक अत्त्यावश्यक :–** एम इ पी म्हणजेच मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि प्लंबिंग संबंधित कामासाठी टेक्नीशियनची नेमणूक. मेकॅनिकल मध्ये एसी, सेन्ट्रलाइज एसी, मोटार पंप, मेकॅनिकल पार्किंग संबंधित कामे आणि नियंत्रण येते. इलेक्ट्रिकलमध्ये इलेक्ट्रिकल कामासंदर्भात गोष्टी तर प्लंबिंग कामात प्लंबिंग संबंधित गोष्टीचे प्लॅनिंग आणि पुढील देखरेख याचा अंतर्भाव होतो. बिल्डींगचा इलेक्ट्रिकल लोड, त्यांच्याशी संबंधित उपकरणाचे संरक्षण, ड्रेनेज लोड, सेप्टिक लाइन डिझाइन आणि अश्या इतर सर्व बाबींचा अभ्यास एम इ पी एजन्सी करते. एम इ पी ही बांधकाम क्षेत्रातील एक समांतर एजन्सी असते जी तयार होणारी इमारत भविष्यात सेवा देताना येणाऱ्या अडचणीचा विचार करून मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि प्लंबिंगमधील सर्व गोष्टीबाबत मेंटेनन्स फ्री कशी राहील, यासाठी डिझाइन केलेली असते. तसेच या कामावर देखरेख ठेवणे आणि योग्य समन्वय साधण्याच काम करत असते.

**५) हाय राईज इमारतीचे काम करताना मटेरीअल आणि क्वालिटी यांना अनन्य साधरण महत्व :–** बिल्डींग बांधताना मटेरीअल आणि क्वालिटी यांना अनन्यसाधारण महत्व दिले पाहिजे. सिमेंट, स्टील आणि त्यांचे ग्रेड तसेच काँक्रीट आणि त्याचा ग्रेड, विटा, कमीत कमी डस्टचे प्रमाण असलेली क्रश सँड, व्ही एस आय खडी, कन्स्ट्रक्शन केमिकल आणि त्याचा योग्य तो वापर या सर्व गोष्टींकडे बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे. प्रत्येक लेबर एजन्सीकडील काम करणारा तांत्रिक स्टाफ तपासणे तसेच त्यांच्या कामाची क्वॉलिटी वेळोवेळी मूल्यांकित करून त्यात आवश्यक ती सुधारणा करणे एक चांगली इमारत उभी करताना गरजेचे आहे. आर सी सी कामात योग्य तितके दिवस आणि तेवढ्या वेळेस पाणी मारून क्यूरींग करणे तसेच फुटिंग, बीम, कॉलम, स्लॅब अशा सर्व आर सी सी आयटमला काँक्रीट काम करताना कव्हरिंग देणे. आर सी सी डिझायरने दिलेल्या शेड्युलप्रमाणे बीम, कॉलम, स्लॅब डिशटरिंग करणे यासारख्या छोट्या पण अत्यावश्यक गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे.



**६) हाय राईज इमारतीसाठी (पी एम सी) कन्सल्टंटची नेमणूक अत्यावश्यक :–** पी एम सी म्हणजे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंसल्टन्सी मध्ये एक टेक्निकल क्वालिफाइड इंजीनिअर जो संबंधित हाय राईज इमारतीचे काम आपल्याला योग्य प्लॅनिंगने, मर्यादित कालावधीत, वेळेत, कमीत कमी मेंटेनन्ससह आणि टेक्निकल पद्धतीने करून देऊ शकतो.

अहिल्यानगरकरांकडून अपेक्षा. अहिल्यानगर–मध्ये हाय राईज इमारतीच्या कामांनी आता चांगला जोर धरला असून विकसक यांनी काम करताना आपण मंजूर केलेल्या प्लॅन प्रमाणे जागेवर काम करून घेणे आवश्यक असून त्यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे हे काम करण्यास सक्षम इंजीनिअरची नेमणूक वास्तू विशारदाकडून भविष्यातील येणाऱ्या अडचणी आणि आवश्यक सर्व गोष्टींचा विचार करून प्लॅन काढून घेणे, आर सी सी डिझाइनर कडूनच डिझाइन करणे त्यासाठी आवश्यक ते सर्व बांधकाम मटेरीअल जिओटेक्निकल एजन्सीकडून तपासून घेणे आणि योग्य त्या भूगर्भातील मातीच्या टेस्ट करून घेणे गरजेचे आहे. विकसक यांनी एम ई पी कन्सल्टंट आणि पी एम सी कन्सल्टंटची नेमणूक करणे आवश्यक आहे. तसेच जास्त एफ एस आय मिळतानाच विकसित करत असलेल्या प्रोजेक्ट मध्ये जास्तीत जास्त मिनीटी कशा देता येतील, याचाही विचार करावा.

हाय राईज इमारतीच्या कामात चांगला प्रकल्प उभा राहण्यासाठी कामावर देखरेख करणाऱ्या इंजीनिअरची आणि सर्व टीमची जबाबदारी आता वाढत आहे. अहिल्यानगरकर यांनी अश्या प्रोजेक्ट मध्ये आपले शॉप अथवा फ्लॅट बुकिंग करताना वरील लेखात नमूद केलेल्या गोष्टींचा सारासार विचार करून निर्णय घेणे हितावह ठरेल हे सांगावेसे वाटते. शहराच्या भरभक्कम उभारणीसाठी आतून मजबूत असलेल्या इमारतीच्या निर्माणाचे काम या प्रकल्पावर काम करणाऱ्या सर्व तांत्रिक टीमकडून होत असताना आपणास याबाबत सविस्तर माहिती असणे हाच या लेखामागील हेतू.

**इंजिनिअर – जितेश अशोक सचदेव**
BE (Civil) (Construction Consultant),
PMC, Turn key project
Off dd : Bank Of Maharashtra Building,
Nagar Manmad road, Ahilyanagar.
Mobile No. 8855809195
Email ID - Enjitesh@gmail.com

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स अँण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
www.aesanagar.com
AESA



संगमनेर येथे ३८ वेठबिगार व ३१ बालकामगारांची मुक्तता करण्यात आली.

## संगमनेर येथे ३८ वेठबिगार व ३१ बालकामगारांची मुक्तता; जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार प्रशासनाची धडक कारवाई

शिर्डी – संगमनेर तालुक्यातील शेंडेवाडी, साकूर, पिंपळगाव, कवटे मलकापूर व कर्जुले पठार येथील वीटभट्टीवर काम करणाऱ्या ३८ वेठबिगार कामगार व ३१ बालकामगारांची मुक्तता करण्यात आली. मुक्तता करण्यात आलेल्या ३८ वेठबिगार कामगारांत २२ पुरूष व १६ महिला कामगार आहेत. ठेकेदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना आज सकाळी प्राप्त झालेल्या तक्रारीवर प्रशासनाने ही तत्परतेने कारवाई केली आहे.

मुक्तता करण्यात आलेले सर्व वेठबिगार व बालकामगार पालघर जिल्ह्यातील असून, तहसीलदारांच्या स्वाक्षरीने बंधमुक्तता प्रमाणपत्र देऊन पोलीस संरक्षणात त्यांना पालघर येथे रवाना करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे व तहसीलदार धीरज मांजरे यांच्या नेतृत्वाखाली ही मुक्तता मोहीम राबविण्यात आली. सरकारी कामगार अधिकारी, सहायक पोलीस निरीक्षक व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांच्यासह १० ते १२ जणांच्या तीन पथकांच्या माध्यमातून ही धडक कारवाई करण्यात आली.

मुक्तता केलेल्या स्त्री, पुरुष व बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यानंतर प्रशासनाच्यावतीने त्यांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली. वेठबिगारीतून मुक्त झालेल्या कामगारांनी जिल्हा प्रशासनाचे आभार मानले आहेत.

दरम्यान, वीटभट्टी ठेकेदार श्री. राठोड यांच्याविरोधात घारगाव पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटी कायदा व वेठबिगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम, १९७६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## समाजाकडून मिळणारा सन्मान कार्यक्षमतेला बळकटी देतो

### अमोल भारती यांचे प्रतिपादन; केडगाव सरोदेनगरमध्ये महापालिका कर्मचाऱ्यांचा गौरव, श्री दत्त मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

नगर – काम करणाऱ्या व्यक्तीचा सन्मान झाला की त्याला पुढील कामासाठी प्रेरणा मिळते. समाजाकडून मिळणारा हा सन्मान त्याच्या कार्यक्षमतेला बळकटी देतो, असे पोलीस उपाधीक्षक अमोल भारती यांनी सांगितले.

केडगाव सरोदेनगर येथील श्री दत्त मंदिराचा तिसरा वर्धापन दिन उत्साहात व सामाजिक जाणीवेने साजरा करण्यात आला. श्री गुरुदेव दत्त सेवा ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात नगर महानगरपालिकेतील विविध क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांचा, स्मशानभूमीत सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा तसेच सामाजिक कार्यकर्त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.



श्री गुरुदेव दत्त सेवा ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात नगर महानगरपालिकेतील विविध क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांचा, स्मशानभूमीत सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा तसेच सामाजिक कार्यकर्त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात पोलिस उपअधीक्षक अमोल भारती व कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या हस्ते कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. या सत्कार समारंभामुळे उपस्थितांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान ओसंडून वाहत होता.

कोरोना महामारीच्या काळात जीवाची पर्वा न करता, सुट्टी न घेता सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. स्वच्छतेपासून ते स्मशानभूमीतील अंतिम सेवा देणाऱ्या या कर्मचाऱ्यांनी समाजासाठी केलेले योगदान वाखाणण्याजोगे होते. या कर्मचाऱ्यांच्या सेवेला सलाम करीत श्री गुरुदेव दत्त देवस्थान ट्रस्टने त्यांच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाची सुरुवात श्री गुरुदेव दत्त यांची महाआरती करून करण्यात आली. दर गुरुवारी महाआरती, महाप्रसाद व धार्मिक उपक्रमांचे आयोजन मंदिरात केले जाते.

ट्रस्टचे अध्यक्ष महेश सरोदे यांनी सांगितले की, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वर्धापन दिनानिमित्त वृक्षवाटपाचा उपक्रम राबवण्यात आला असून पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजात दिला जात आहे. मंदिर परिसरातील नागरिकांच्या अडचणी सोडवण्याचा ट्रस्टचा नेहमीच प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाला रघुनाथ लोंढे, सोपान कारखिले, नामदेव चव्हाण, धनंजय जामगावकर, संस्थापक पोपटराव सरोदे, ट्रस्टचे अध्यक्ष महेश सरोदे, योगेश सरोदे, अभिनव लोंढे, आकाश जरे, मनोहर बगळे, हर्षद अंकुश, सागर कारळे, गोरख हुलगे, नवनाथ लोंढे, सचिन कोतकर, पांडुरंग कोतकर, न्यानेश्वर तोडमल, दत्ता भगत, रोहित गाडेकर, परमेश्वर आवटे, केदारे सर, बोरकर काका, प्रशांत गायकवाड, सचिन सरोदे, कृष्णकांत जरे, युवराज दळवी, आरती सरोदे, राणी सरोदे, मोनिका म्हस्के, संगीता जारे, स्वाती तांदळे, अनिता गीते आदीं उपस्थित होते.

## १४ लाखांहून अधिक सदस्य आणि विद्यार्थ्यांनी सशस्त्र दल आणि देशासोबत एकता दाखववावी : आयसीएआय

नगर – आयसीएआयने १४ लाखांहून अधिक सदस्यांना आणि विद्यार्थ्यांना सशस्त्र दल आणि देशासोबत एकता दाखवण्याचे आवाहन केले आहे.

भारतात चार्टर्ड अकाउंटंट्स व्यवसायाचे नियमन आणि विकास करण्यासाठी चार्टर्ड अकाउंटंट्स कायदा, १९४९ अंतर्गत संसदेच्या कायद्याद्वारे स्थापन करण्यात आलेली जगातील सर्वात मोठी अकाउंटिंग संस्था, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) ने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी अड्ड्यांविरुद्धच्या अलिकडच्या कारवाईसाठी सरकार आणि भारतीय लष्कराला पाठिंबा दिला आहे.

भारतातील ५ प्रादेशिक परिषदा, १७७ शाखांमध्ये पसरलेले १४ लाखांहून अधिक सदस्य आणि विद्यार्थी असलेले एक विशाल नेटवर्क, तसेच ४७ देशांमधील ५२ परदेशी शाखा आणि ३३ प्रतिनिधी कार्यालयांमध्ये ४०,००० हून अधिक सदस्य असलेले आयसीएआय मानवतावादी प्रयत्नांमध्ये महत्त्वपूर्ण प्रभाव पाडण्यासाठी अद्वितीयपणे स्थानावर आहे. वाढत्या तणावाच्या या काळात, संस्था राष्ट्रीय एकता प्रती आपली दृढ वचनबद्धता पुन्हा व्यक्त करते आणि देश आणि त्याच्या लोकांना पाठिंबा देण्यासाठी सज्ज आहे.

भारतातील सुमारे १७,००० पिन कोडमध्ये आयसीएआयची व्यापक उपस्थिती आहे, ज्यामध्ये भारत–पाकिस्तान सीमेजवळ असलेल्या १३ हून अधिक शाखांचा समावेश आहे. या सीमावर्ती प्रदेशांमधील चार्टर्ड अकाउंटंट स्थानिक समुदायांना आणि अधिकाऱ्यांना आवश्यकतेनुसार मदत करण्यासाठी त्यांचा वेळ, कौशल्य आणि संसाधने सक्रियपणे स्वयंसेवा करून प्रतीकात्मक समर्थनाच्या पलीकडे जाण्यासाठी योग्य स्थितीत आहेत. आयसीएआयच्या मजबूत स्थानिक नेटवर्कद्वारे, सदस्य आणि विद्यार्थी स्वयंसेवक गरजूंना वेळेवर आणि प्रभावी मदत पोहोचविण्यासाठी सरकारी संस्था, स्वयंसेवी संस्था आणि मदत संस्थांशी सहयोग करू शकतात.



सीए चरणज्योतसिंग नंदा

आयसीएआयचे स्वयंसेवक मदत प्रयत्नांना सुलभ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात – स्थलांतर, विस्थापित नागरिकांसाठी आश्रय छावण्या उभारणे, रुग्णवाहिका सेवा, ऑक्सिजन सिलिंडरची व्यवस्था करणे आणि आवश्यक औषधे वाटणे. ते रक्तदान शिबिरे आणि इतर महत्त्वाच्या मदत सेवा देखील आयोजित करू शकतात. याव्यतिरिक्त, आयसीएआय बांधवांना सतर्क राहण्याचे, या कठीण काळात कोणत्याही संशयास्पद किंवा देशविरोधी कारवायांची तक्रार करण्यासाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेला पाठिंबा देण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले जाते.

सीए आयसीएआयचे अध्यक्ष चरणजोत सिंग नंदा यांनी भारतीय सशस्त्र दलांच्या शौर्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक केले आणि देशभरातील संपूर्ण सीए बंधुत्वाला आपल्या सशस्त्र दलांसोबत उभे राहण्याचे स्पष्ट आवाहन केले. त्यांनी यावर भर दिला की आयसीएआयचे १४ लाखांहून अधिक आर्थिक सैनिक केवळ शब्दांतच नव्हे तर अर्थपूर्ण कृतीतही वचनबद्ध आहेत.

सीए बंधुत्वाला संबोधित करताना ते म्हणाले, आयसीएआय आपल्या सैनिकांच्या धाडसाला आणि दृढनिश्चयाला सलाम करते. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप जीव गमावलेल्या दुःखद मृत्यूचा बदला घेण्यासाठी त्यांच्या शौर्याबद्दल आम्हाला प्रचंड अभिमान आहे. ऑपरेशन 'सिंदूर' हा नवीन भारताचा एक शक्तिशाली संदेश आहे, जो भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्याच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही हे प्रतिपादन करतो. आयसीएआय नेहमीच 'राष्ट्र प्रथम' या तत्त्वाचे पालन करत आला आहे. आपल्या देशाला हादरवून टाकणाऱ्या प्रत्येक वादळात, आपण आपल्या मातृभूमीला आधारस्तंभ म्हणून मजबूत उभे राहिलो आहोत. राष्ट्रपतींनी सर्व आयसीएआय सदस्यांना आणि विद्यार्थ्यांना या प्रसंगी जागरूक राहण्याचे, सतर्क राहण्याचे आणि देशाची अखंडता आणि सुरक्षिततेचे रक्षण करून सेवेच्या सर्वोच्च आदर्शांना कायम ठेवण्याचे आवाहन केले.

या कठीण काळात आपण एकत्र येऊया. सीए बंधुत्वाने उदाहरण देऊन नेतृत्व करूया, हे सिद्ध करूया की आपण केवळ आर्थिक कारभारीच नाही तर आपल्या राष्ट्रासाठी शक्ती, करुणा आणि लवचिकतेचे आधारस्तंभ देखील आहोत, असे ते पुढे म्हणाले.

सीए. आयसीएआयचे उपाध्यक्ष प्रसन्नकुमार डी म्हणाले, आम्ही आमच्या मातृभूमीचे आर्थिक सैनिक आहोत. राष्ट्रीय गरजेच्या प्रत्येक घटकेत, आम्ही आमच्या देशाची सेवा करण्यास तयार आहोत,

राष्ट्रीय कारणांसाठी योगदान देण्याचा आणि संकटाच्या वेळी नागरिकांना पाठिंबा देण्याचा ICAI चा अभिमानास्पद वारसा आहे. १९७१ च्या भारत–पाक युद्धादरम्यान, आयसीएआय सदस्यांनी शहीदांच्या कुटुंबियांना निःस्वार्थ सेवा दिल्या. कोविड–१९ साथीच्या सर्वात काळ्या काळात, आयसीएआयने शोकाकुल कुटुंबांना मदत केली, पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली आणि स्वप्ने पुढे चालू ठेवण्यासाठी शुल्क माफ केले. संस्थेच्या सदस्यांनी केवळ आमच्या सदस्यांसाठीच नव्हे तर मोठ्या प्रमाणात जनतेसाठी अन्न मोहीम, रक्त आणि प्लाझ्मा दान शिबिरे आणि लसीकरण शिबिरे देखील आयोजित केली.

आमच्या प्रादेशिक परिषदा, शाखा, परदेशी चॅप्टर, अभ्यास मंडळे आणि अभ्यास चॅप्टरद्वारे, आयसीएआयच्या विशेष कोविड टास्क फोर्सने ऑक्सिजन सिलिंडर आणि कॉन्सन्ट्रेटरसह महत्त्वाची मदत पोहोचवली, हॉस्पिटल बेड, औषधे, रुग्णवाहिका आणि जेवणाची व्यवस्था केली. अनेक शाखांनी रुग्णालयांना महत्वाच्या वस्तू देखील दान केल्या, स्थानिक आरोग्यसेवा पायाभूत सुविधांची सर्वात जास्त गरज असताना त्यांना बळकटी दिली.

हे योगदान केवळ आकडेवारी नाही तर आयसीएआय बंधुत्वाच्या आपल्या भारतमातेप्रती असलेल्या करुणेचे ठसे आहेत. राष्ट्र उभारणीतील एक विश्वासार्ह भागीदार म्हणून, आयसीएआय सशस्त्र दल, पंतप्रधान आणि भारतातील नागरिकांना पाठिंबा देण्यासाठी वचनबद्ध आहे. संस्था आर्थिक व्यावसायिकांना व्यवसायाच्या पलीकडे जाऊन देशभक्ती, करुणा आणि राष्ट्राप्रती अटळ कर्तव्य बजावण्यासाठी प्रेरित करत राहते.



विळद घाट येथील डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र अंतर्गत व्यावसायिक प्रशिक्षणात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला (छाया– विजय मते)

# विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकीमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र अंतर्गत विविध व्यावसायिक प्रशिक्षण वर्गांना सुरुवात

नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आणि नाविन्यता मार्गदर्शन केंद्र अंतर्गत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राच्या वतीने सोलर पॅनल इलेक्ट्रिशियन, ॲक्टिव्ह मॅन्युफंक्चरिंग, थ्रीडी मीटिंग, इलेक्ट्रॉनिक्स हार्डवेअर असेम्ब्ली आणि ज्युनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर या प्रशिक्षण वर्गांसाठी मान्यता मिळाली आहे. सदर प्रशिक्षण वर्ग २१ एप्रिल पासून सुरु झाले असून प्रत्येक बॅचमध्ये ३० विद्यार्थ्यांची क्षमता आहे. अशी माहिती प्राचार्य डॉ.उदय नाईक यांनी दिली.

प्रशिक्षण कार्यक्रम ५४०, ३९०, ३९० आणि ४५० तासांच्या कालावधीचे असून त्याचे समन्वयक म्हणून डॉ.अमित लावरे कार्यरत आहेत.

या प्रशिक्षणांद्वारे विद्यार्थ्यांना नोकरीसाठी तसेच स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक कौशल्ये व ज्ञान विकसित करण्यात मदत होईल, असा विश्वास संस्थेने व्यक्त केला आहे. कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी प्रा. कानिफ मरकड, प्रा. स्नेहा आवाजे, प्रा. चैतन्य कलावडे, प्रा. अश्विनी देशमुख, प्रा.नितिन पोंदे, राहुल गावडे या सर्वांनी पार पाडली.

या उपक्रमाबद्दल जलसंपदा मंत्री व संस्थेचे चेअरमन राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुजय विखे पाटील, संस्थेचे जनरल डायरेक्टर (प्रशासन) डॉ.पी.एम. गायकवाड, डायरेक्टर (टेक्निकल) प्रा.सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ.उदय नाईक यांनी कौतुक केले आहे.

# श्री विश्वकर्मा पांचाळ तांबट समाज भूषण गौरव पुरस्काराने सुनील नाळके यांचा गौरव



श्री विश्वकर्मा (पांचाळ) तांबट समाज, संगमनेर यांच्या वतीने सुनील नाळके यांना श्री विश्वकर्मा पांचाळ तांबट समाज भूषण गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नगर – संगमनेर येथील श्री नविनभाई शाह मंगल कार्यालयात श्री विश्वकर्मा (पांचाळ) तांबट समाज, संगमनेर यांच्या वतीने आयोजीत मौंजीबंधन सोहळा, वधुवर परिचय मेळावा व राज्यस्तरीय समाज मेळावा महाराष्ट्र या विशेष कार्यक्रमात सुनील नाळके यांना श्री विश्वकर्मा पांचाळ तांबट समाज भूषण गौरव पुरस्कार प्रदान आला आहे.

याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत श्रीक्षेत्र देवगडचे महंत ह.भ.प. भास्करगिरी महाराज, जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार अमोल खताळ पाटील, आ.सत्यजित तांबे, सौ. जयश्रीताई थोरात, विष्णुपंत गोमासे, बाळासाहेब नगरकर, आ.संग्राम जगताप, उद्योजक गिरीश मालपाणी, विश्वकर्मा पतसंस्थेचे चेअरमन देविदास गोरे, पुरोहित संघाचे अध्यक्ष नरेंद्र लक्ष्मीकांत तथा भाऊ जाखडी आदी उपस्थित होते.

सुनील नाळके यांनी समाजहितासाठी जे योगदान दिले आहे, त्यांच्या कार्याचा दर्जा, निःस्वार्थ वृत्ती व समाजासाठी असलेली बांधिलकी सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.



उपचारानंतर बरा झालेला हिंदुत्ववादी तरुण प्रज्वल गीते याच्या समवेत निखिल वारे, संग्राम जगताप आदी.

# निखिल वारे व जगदंबा युवा प्रतिष्ठानने उचलला हिंदुत्ववादी जखमी तरुणाच्या उपचाराचा खर्च

नगर – सावेडी उपनगरातील जगदंबा युवा प्रतिष्ठानच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त प्रभागातील नागरिकांसाठी छावा या चित्रपटाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्यानिमित्त, बलिदान दिनाच्या आदल्यादिवशी परिसरात भगवे झेंडे लावण्याचा उपक्रम स्थानिक युवकांनी राबविला. या उपक्रमादरम्यान, हिंदुत्ववादी विचारांचा धडाडीचा तरुण प्रज्वल गीते याचा हात विद्युत प्रवाह असलेल्या तारेला लागल्यामुळे त्याला तीव्र शॉक बसून तो गंभीर जखमी झाला. तत्काळ प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी त्याला सुरभी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. दोन महिन्यांपर्यंत विविध शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले. हॉस्पिटल प्रशासनाने सामाजिक बांधिलकी जपत कमी दरात सेवा पुरविल्या. आज प्रज्वल गीते पूर्णतः बरा झाला असून, त्याला हॉस्पिटलमधून डिस्चार्ज देण्यात आला. उपचाराच्या कालावधीत हॉस्पिटलमधील डॉक्टर, नर्सेस व कर्मचारी वर्गाने दिलेल्या उत्तम सेवेमुळे कृतज्ञता व्यक्त करत, त्यांचा सत्कार माजी नगरसेवक निखिल वारे व जगदंबा युवा प्रतिष्ठानच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. विशेष म्हणजे, प्रज्वलच्या संपूर्ण उपचाराचा खर्च निखिल वारे आणि प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी उचलला.

या काळात डॉ. सुजय विखे पाटील यांनीही वेळोवेळी प्रज्वलच्या प्रकृतीची चौकशी केली. डिस्चार्ज मिळाल्यानंतर आमदार संग्राम जगताप हॉस्पिटलमध्ये जाऊन प्रज्वलची भेट घेतली व त्याच्या तब्येतीची विचारपूस केली.

यावेळी सोमेश्वर म्हस्के, सचिन गाडे, सचिन वारे, बापू गायकवाड, श्रीनिवास कासार, आरिफ मुल्ला, सचिन सानप, सुशांत म्हस्के, भास्करराव हांडे, शिवाजीराव मिसाळ, विकास जगताप, मिसाळ, खोसे काका, खांदवे सर, सार्थक आडेप, शंतनु आडेप, वेदांत नडीमेटला, अजिंक्य तिवारी, सुधाकर देशपांडे, तुवर नाना, सतीश शहा, युवराज बार्शीकर आदींसह नागरिक उपस्थित होते.

# सामूहिक विवाह सोहळा आयोजनासाठी नोंदणीकृत सेवाभावी संस्था, यंत्रणांनी प्रस्ताव सादर करावेत

नगर – कन्यादान योजनेतर्गत जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या दांपत्यांसाठी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यासाठी नामांकित नोंदणीकृत सेवाभावी संस्था व यंत्रणांनी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन राजुर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले आहे. सन २०२५–२६ या वर्षात जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या जोडप्यांना २५ हजार रुपये व सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या नोंदणीकृत सेवाभावी संस्था, यंत्रणांना प्रत्येक जोडप्यामागे २,५०० रुपये इतके अनुदान देण्यात येणार आहे.

## संस्था व यंत्रणांसाठी अटी व शर्ती

प्रस्तावासोबत संस्थेचा नोंदणी दाखला, संस्थेच्या घटनेची प्रत, संचालक मंडळाची यादी, अध्यक्ष व सचिव यांची आधारकार्ड प्रत जोडावी. संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असावी. आर्थिक व्यवहारात गैरव्यवहार अथवा गुन्हा नसल्याचे १०० रुपयांच्या स्टँप पेपरवरील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

संस्थेने वर व वधूचे विवाह नोंदणी अर्ज शासन निर्णयानुसार आवश्यक कागदपत्रांसह प्रकल्प अधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक राहील. प्रस्ताव व लाभार्थ्यांची कागदपत्रे अपूर्ण असल्यास संस्थेची निवड रद्द करण्यात येईल व अनुदान देण्यात येणार नाही. सहभागी दांपत्यांना विवाहाच्या दिवशी विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.

संस्थेने सादर करावयाच्या प्रस्तावाचा नमुना, अटी व शर्ती ३ मार्च २००४, १८ फेब्रुवारी २००९ व १५ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्ट 'अ' व 'ब' प्रमाणे असाव्यात. मंजूर लक्षांकानुसार पात्र लाभार्थी न मिळाल्यास लक्षांक वर्गवारीत बदल करण्याचे अधिकार व इतर अनुषंगिक अधिकार प्रकल्प अधिकारी यांच्याकडे राहतील. अधिकच्या अटी व शर्ती संस्थांवर बंधनकारक राहतील.

लाभार्थ्यांची निवड आवश्यक कागदपत्रे, अर्जाची ज्येष्ठता, निधीची उपलब्धता, प्राप्त लक्षांक व क्षेत्रानुसार निश्चित केलेल्या निकषांवर केली जाईल. संस्थेची निवड प्रकल्प अधिकारी कार्यालयामार्फत नियमाप्रमाणे होईल. निवड झालेल्या संस्थांनी विवाह सोहळ्याची तारीख, आमंत्रण व निमंत्रण पत्रिका विवाहापूर्वी १५ दिवस आधी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

संस्थेने विवाह सोहळ्याचे छायाचित्रण, चलचित्रफीत, फोटो अहवाल जिओटॅग लोकेशनसह सादर करावा. अनुदानाची रक्कम वर व वधूच्या संयुक्त खात्यात तसेच संस्थेच्या स्वतःच्या आधार लिंक असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या खात्यात डीबीटी (Direct Benefit Transfer) प्रणालीद्वारे जमा केली जाईल.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर यांच्या मार्गदर्शनाखाली योजनेची अंमलबजावणी व तपासणी केली जाईल. सन २०२५–२६ साठी टीएसपी क्षेत्रासाठी ५० व ओटीएसपी क्षेत्रासाठी ५० लक्षांक मंजूर आहेत. प्रत्येक विवाह सोहळ्याच्या आयोजनासाठी किमान १० नवदांपत्ये असणे आवश्यक आहे.

निवड झालेल्या संस्थांनी कन्यादान योजनेच्या शासन निर्णयाप्रमाणे कार्य करणे बंधनकारक आहे. योजनेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत १०० रुपयांच्या स्टँप पेपरवर करारनामा लिहून द्यावा लागेल.

## लाभार्थ्यांसाठी आवश्यक पात्रता, अटी व शर्ती

लाभार्थ्यांचा अर्ज आवश्यक आहे. नवदांपत्यांपैकी एक जण म्हणजेच वर किंवा वधू अनुसूचित जमातीचा असावा. यासाठी सक्षम अधिकाऱ्याचा जातीचा दाखला, जन्मतारीखसाठी शाळा सोडल्याचा दाखला, आधारकार्ड, रेशनकार्ड, आधार लिंक असलेले राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, यापूर्वी योजनेचा लाभ घेतला नसल्याचा ग्रामसेवकाचा दाखला, डोमिसाईल दाखला, वर व वधूचा हा प्रथम विवाह असल्याचे व त्यांना अपत्य नसल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

वराचे वय किमान २१ वर्षे व वधूचे वय किमान १८ वर्षे पूर्ण असावे. बालविवाह प्रतिबंधक कायदा व हुंडा प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन न केल्याचे वर व वधूने १०० रुपयांच्या स्टँप पेपरवर विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करणे बंधनकारक आहे. लाभार्थ्यांनी आपले अर्ज निवड झालेल्या संस्थेकडे सादर करावेत. अनुदान वर व वधूच्या संयुक्त बँक खात्यात डीबीटी प्रणालीद्वारे जमा करण्यात येईल.

# सर्वसामान्य नागरिकांना चांगल्या आरोग्य सेवा देण्यासाठी लवकरच रुग्णालय सुरू होणार

### आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे, आरोग्य विषयक उपाययोजनांमुळे महापालिकेच्या राज्यस्तरीय रँकिंगमध्ये सुधारणा

नगर – महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयातर्फे दरमहा जाहीर होणाऱ्या आरोग्य कार्यक्रमांच्या राज्यस्तरीय रँकिंगमध्ये मार्च २०२५ या महिन्यात अहिल्यानगर महानगरपालिकेने राज्यात पाचव्या क्रमांकावर झेप घेतली आहे. यापूर्वी जानेवारी महिन्यात दहावा क्रमांक मिळवला होता. दोन महिन्यात केलेल्या उपाययोजनांमुळे पहिल्या पाच क्रमांकामध्ये महानगरपालिकेने स्थान मिळवले आहे. लवकरच आरोग्यवर्धीनी केंद्रे सुरू करून नागरिकांना अधिक चांगली सेवा देण्याचा प्रयत्न असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

महानगरपालिकेने माता मृत्यू रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजना, कुटुंब नियोजन, बालकांचे आरोग्य, आरोग्य केंद्र, शासकीय योजनांची अंमलबजावणी, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आशा कार्यक्रम, ई औषधी, माता आणि बाल आरोग्य सुधारणा, लसीकरण कार्यक्रमांचे व्यापक आयोजन, संक्रामक व असंक्रामक रोग नियंत्रणासाठी विशेष उपक्रम, तंत्रज्ञानाच्या मदतीने आरोग्य व्यवस्थापन अशा विविध उपाययोजना व कार्यक्रमांमध्ये चांगली कामगिरी केली. त्यामुळे महानगरपालिकेला ४०.९४ गुण मिळाले व राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये पाचवे स्थान मिळवले. आरोग्य विषयक उपाययोजना व सुधारणा करण्यासाठी सातत्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना देऊन उपक्रम हाती घेतले जात आहेत. येत्या काळात पहिल्या तीन क्रमांकामध्ये स्थान मिळवण्याच्या दृष्टीने अधिक चांगल्या उपाययोजना व सेवा देण्याचा प्रयत्न महानगरपालिका करत आहे. शासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या अभियानातून शहरात आरोग्यवर्धिनी केंद्रे सुरू करण्यात आली आहे. आणखी सहा केंद्रे लवकरच सुरू होतील. त्यातून चांगली आरोग्य सेवा उपलब्ध होईल, असेही यशवंत डांगे यांनी सांगितले.



## दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा भाजपतर्फे सत्कार

दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा भारतीय जनता पार्टी सावेडी मंडल यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सीए ज्ञानेश्वर काळे, नितीन शेलार, बाळासाहेब गायकवाड, वैभव झोटिंग, सुमित बटुळे, आकाश सोनवणे, सुमित कुरुंद, लखन शिंदे, जीवन चाबुकस्वार, मनोज भगत आदि कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.



दहावी व बारावीच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत तक्षिला विद्यालयाच्या शिक्षक.

# तक्षिला स्कूलची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

नगर – सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशनने २०२५ मध्ये घेतलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून त्यात अहिल्यानगरमधील जामखेड रोडवरील तक्षिला विद्यालयातील इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी १२ वर्षांची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत यशाच्या शिखरावर उत्तुंग भरारी घेतली असून १७ विद्यार्थी हे ९०% पेक्षा अधिक गुण मिळवणारे तर तब्बल २९ विद्यार्थी हे ८०% पेक्षा अधिक गुण मिळवणारे ठरले आहेत.

सर्वच विद्यार्थ्यांनी उत्तम यश मिळवत तक्षिला विद्यालयाचा बहुमान उंचावला. कुमारी जान्हवी दरंदले हिने ९८.२०% मिळवत प्रथम क्रमांक तर वेदिका राऊत हिने ९८% मिळवत दुसरा क्रमांक आणि प्रेरणा डमाळे हिने ९७.४०% मिळवत तिसरा क्रमांक पटकावला. जान्हवीने इंग्रजी विषयात १०० गुण घेतले तर सार्थक खाकाळ व वैदेही शिवणकर यांनी मराठी विषयात शंभर पैकी १०० गुण मिळवत शिक्षकांची शाब्बासकी मिळवली. सर्वच विद्यार्थ्यांचे शाळेच्या प्राचार्यांसह सर्व शिक्षकांनी खूप कौतुक करत शुभेच्छा दिल्या व त्यांचा सन्मानही केला.

इयत्ता बारावीच्या वाणिज्य शाखेचा निकाल शंभर टक्के लागला यातही रुहीनाज शेख हिने ८४ % गुण मिळवत प्रथम क्रमांक घेतला तर अस्मित नैय्यर याने ८१.८०% गुण मिळवत द्वितीय व योगेश डागर याने ८०.८०% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. विज्ञान शाखेच्या क्रिझॅन परेरा हिने ८३.८०% गुण मिळवत प्रथम क्रमांक तर सुप्रिया शिंदे हिने ८३.२०% गुण मिळवत दुसरा क्रमांक व कशिका गाडगे हिने ७४.२० % गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला.

विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने स्पर्धेच्या युगात उतरावे व नावलौकिक मिळवावा याकरिता मागील १२ वर्षांपासून उज्वल यशाची परंपरा राखत तक्षिलाचे प्रशिक्षित शिक्षक वृंद व प्राचार्या जयश्री मेहेत्रे यांचे शिस्तबद्ध नियोजन यामुळेच विद्यार्थ्यांनी ही उत्तुंग भरारी घेतली आहे अशी प्रतिक्रिया पालकांनी दिली.

# महर्षी ग. ज. चितांबर विद्यालयाचा ८५.५५ % निकाल

नगर – येथील नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग. ज. चितांबर विद्या मंदिर चा एसएससी परीक्षेचा निकाल ८५.५५% लागला आहे. विद्यालयाची विद्यार्थिनी कु. कार्तिकी सोनवणे हिने ९३.६०% गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला आहे तर कु. प्रियंका दातरंगे आणि कु. वेदश्री व्यवहारे यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. विद्यालयातील एकूण ९० विद्यार्थी एस.एस.सी. परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १० विद्यार्थी विशेष योग्यता श्रेणी, २९ विद्यार्थी प्रथम श्रेणी, २४ विद्यार्थी द्वितीय श्रेणी तर १४ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत असे एकूण ७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

'मागेल त्याला विना डोनेशन सहज प्रवेश' आणि माफक फी असल्याने शाळेत सर्वच स्तरातील कष्टकरी पालकांचे पाल्य मोठ्या प्रमाणात शिक्षण घेतात. कोणत्याही विशेष शिकवणीशिवाय केवळ शाळेतील मार्गदर्शन व वैयक्तिक मेहनतीतून विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश निश्चितच स्पृहणीय आहे असे प्रतिपादन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विभावरी रोकडे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, सचिव निलेश वैकर व कार्यकारिणीने विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# घटस्फोटीत, विकलांग, विधवा, विदुर भारताच्या बाहेरील वर- वधूंसाठी सुजाग सिंधी मंच इंदौरतर्फे परिचय संमेलन

नगर – सुजाग सिंधी मंच इंदौर तर्फे घटस्पोटीत, विकलांग, विधवा, विदुर भारताच्या बाहेरील वर वधु साठी पुस्तीकाचे प्रकाशन व परिचय संमेलनाचे आयोजन केले जाणार आहे. लवकरात लवकर रजिस्ट्रेशन करून घेणे. अधिक माहितीसाठी प्रकाश मदनानी ८९८९६२५९२०, किशोर कंत्रोड ८९९९८१२४०८/९२२६७८३१०१

नागपूर सिंधी सोसियल फार्म पूज्य समाज आश्रम द्वारा घटस्फोटीत, विकलांग, विधवा, विदुर वर वधु साठी पुस्तीकाचे प्रकाशन केले जाणार आहे. अधिक माहितीसाठी मोहन मंजानी ७८८७५६५१४७, प्रकाश चेतवाणी ७५८८७६३०८१, दिलीप सावलानी ९३७३४५४८००, किशोर कंत्रोड ८९९९८१२४०८/९२२६७८३१०१

संमेलनात भाग घ्यायचा त्यांनी आपल्यासोबत वर व वधु आणणे जरुरी आहे. त्या शिवाय त्यांना आत प्रवेश दिला जाणार नाही.

अधिक माहितीसाठी बडते कदम रायपुर नंदलाल मुलतानी ९१३१३४०६१० / ९४२५५०२५७०, सोलापूर मीना नागदेव ८६६८५०९०३०, नांदेड चंद्रप्रकाश लालवाणी – ९४२२१७४७५१, उल्हासनगर विनोद भारानी – ९८२२०६५७४४, न्यु मुंबई सुभाष राय गोगिया झुलेलाल मंदिर – ९८२११३०५९०, बीड– डॉ. मदनलाला जेसवानी– ९८९०४६०७००, ठाणे संतराम माखिजा –९८१९५१०७४४, नाशिक प्यारा परिवार शाम मोटवानी – ९८२२०६१६१२, महेश नागपाल – ९८२२०९४९६०, पुणे वर्षा मोहनानी ९०४९४६४१५१, हैद्राबाद मॅरेज ब्युरो हॉल अशोक वासवानी ९८४९४७७९७४, सिंधी प्रोग्रेस मेटरीमोनियम ओरगनायजेशन पिंपरी पुणे जवाहर कोटवाणी ९८२२५६२००५, श्रीचंद नागरणी ९८२२३२३८१८, कुमार मोटवानी ९८२३०१६४२५, टेहेल चुगानी ९८२३६६८८७८, अहिल्यानगर किशोर कंत्रोड ८९९९८१२४०८/९२२६७८३१०१, मधुर मिलन मेरेज ब्युरो, (सोशल सर्व्हिस) किशोर प्रोव्हिजन स्टोअर, इंदरा कॉलनी, तारकपूर, अहिल्यानगर, अशी माहिती किशोर कंत्रोड, मोहन मंजानी, प्रकाश मादनानी, महेश मध्यान, दिलीप सावलानी यांनी दिली आहे.

## अहमदनगर हायस्कूल १० वीचा निकाल ९०%

नगर – अहमदनगर यतिमखाना संचलित अहमदनगर हायस्कूल (मराठी माध्यम) या विद्यालयाचा मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इ.१०वीच्या परीक्षेचा निकाल ९०% लागला असून प्रथम तीन आलेले विद्यार्थी १. शेख अरबिना समीर – ७३.८०%, १. शेख आसिया रहीम – ७३.८०%, २. खान नगमा सलीम – ६८.८०%, ३. कुरेशी मेहेक रमजान – ६५.८०%. संस्थेचे चेअरमन हाजी सय्यद अलीमभाई संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि संचालक तसेच विद्यालयाच्या प्राचार्या सौ.सय्यद शाहीदा आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# अहमदनगर एज्युकेशन सोसायटीमार्फत ११ वी साठी मोफत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

नगर – महाराष्ट्रात इ. ११वी प्रवेश प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी सर्व कनिष्ठ महाविद्यालयांमधील इ. ११ वी ची प्रवेश प्रक्रिया एकाचवेळी ऑनलाईन पध्दतीने राबविण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यामुळे इ. ११वी ची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय प्रवेश प्रक्रियेनुसार होणार असून राज्यातील विद्यार्थ्यांना कोणत्याही ठिकाणच्या कॉलेजमध्ये प्रवेशासाठी अर्ज करता येईल. संपूर्ण राज्यभर केंद्रीय पध्दतीने प्रवेश अर्ज करण्याचे हे पहिलेच वर्ष असल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये भितीचे वातावरण आहे.

प्रवेश अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांना सुलभता व्हावी व त्यांना ऑनलाईन अर्ज भरतांना येणाऱ्या अडचणींचे तात्काळ निवारण व्हावे यासाठी विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा अहमदनगर एज्युकेशन सोसायटीमार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ही सुविधा अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांसाठी संस्थेच्या १) भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व उच्च माध्य. विद्यालय, अहिल्यानगर २) रूपीबाई मो. बोरा न्यू इं. स्कूल व उच्च माध्य. विद्यालय, अहिल्यानगर, ३) अशोकभाऊ फिरोदिया इं. मि. स्कूल व ज्यु. कॉलेज, अहिल्यानगर आणि ४) भिंगार माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय, भिंगार येथे मोफत स्वरूपात कार्यालयीन वेळेत उपलब्ध असल्याबाबत संस्थेच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छाया फिरोदिया यांनी माहिती दिली आहे.

# निरामय



## नैराश्यावर संत्र्यांचा उपाय

आरोग्यचर्चा
डॉ. मेघा दळे

गेल्या काही वर्षांमध्ये लोकांवरचा मानसिक ताण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. कामातील तणाव, सगळ्यांच्या पुढे राहण्याची स्पर्धा, धावपळ यामुळे हल्ली अनेकजण नैराश्याची शिकार होत आहेत. 'हार्वर्ड मेडिकल स्कूल' आणि 'मॅसॅच्युसेट्स जनरल हॉस्पिटल'मधील संशोधकांनी नुकत्याच केलेल्या एका संशोधनात यावरचा उपाय सापडला आहे. या संशोधनानुसार दररोज एक संत्र खाल्ल्याने नैराश्याचा धोका २० टक्क्यांनी कमी होतो. यासंदर्भातील अहवाल 'मायक्रोबायोम' या नियतकालिकात प्रकाशित झाला आहे.

संत्र्यासारखी लिंबूवर्गीय फळं शरीरात 'फेकल बॅक्टेरियम प्रुस्नित्झी' नावाच्या एका विशेष जीवाणूच्या वाढीसाठी पोषक वातावरण तयार करतात. त्यामुळे मूड सुधारणाऱ्या सेरोटोनिन आणि डोपामाइन या हार्मोन्सचं उत्पादनवाढतं. परिणामी व्यक्तीचा मूड सुधारतो आणि नैराश्याचा धोका कमी होण्यास मदत होते.

**नैराश्य कसे ओळखाल?**

सततच्या नकारात्मक भावना, वर्तनातील बदल आणि काही शारीरिक लक्षणं पाहिल्यास स्वतःमध्ये किंवा इतरांमध्ये नैराश्य असल्याचं दिसून येतं. नैराश्यात, एखाद्या व्यक्तीला सतत दुःख, कामांमध्ये रस कमी होणं, भूक किंवा झोपेच्या सवयींमध्ये बदल, जास्त थकवा आणि लक्ष केंद्रित करण्यात किंवा निर्णय घेण्यात अडचण येणं, असे अनुभव येतात. ही लक्षणं दोन आठवडे किंवा त्याहून अधिक काळ राहिली, तर तज्ज्ञांचा सल्ला घेणं आवश्यक ठरतं.

**एक लाख लोकांवर अभ्यास**

या संशोधनात एक लाखाहून अधिक महिलांच्या आहार आणि आरोग्याशी संबंधित डेटाचं विश्लेषण करण्यात आलं. त्यातून केवळ संत्री, लिंबू आदी लिंबूवर्गीय फळांच्या सेवनाने नैराश्याचा धोका कमी झाल्याचा निष्कर्ष निघाला. तर सफरचंद आणि केळीसारख्या इतर फळांचा असा कोणताही परिणाम दिसून आला नाही. लिंबूवर्गीय फळांमध्ये आढळणारे घटक आतड्यांतील विशिष्ट बॅक्टेरियांच्या वाढीला प्रोत्साहन देतात आणि त्याचा मानसिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो, असं शास्त्रज्ञांचं मत आहे.

**संत्री आरोग्याचा खजिना!**

संत्र्यामध्ये असलेलं क जीवनसत्व शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतं आणि त्वचा तजेलदार बनवतं. शिवाय संत्र्यामध्ये असलेले फ्लेव्होनॉइड्स हृदयाचं आरोग्य सुधारतात, कोलेस्टेरॉल नियंत्रित करतात आणि रक्तवाहिन्यांमध्ये अडथळे निर्माण होण्यापासून बचाव करतात. संत्र्यांमधल्या फायबरमुळे पचनसंस्था सुधारते आणि पोटाची चरबी कमी करण्यास मदत होते.

**औषधात समावेश**

या अभ्यासाचे नेतृत्त्व करणारे डॉ. राज मेहता यांनी हार्वर्ड गॅझेटला सांगितले, भविष्यात नैराश्यावर उपचार करण्यासाठी संत्र्यांचा समावेश औषधांमध्ये केला जाऊ शकतो.



## बर्फ खावा का?

आरोग्य व्यवस्थापन
डॉ. प्रसन्न नेने

कडक उन्हाळ्यात प्रत्येकाला थंड पाणी किंवा शीतपेय प्यावंसं वाटतं. काही लोक तर थेट तोंडात बर्फाचा तुकडाच तोंडात टाकतात. बर्फामुळे काही काळ नक्कीच तजेला मिळतो; परंतु ते आरोग्यासाठी हानिकारक असू शकतं.

*** दातांना धोका**

बर्फ तोंडात ठेवण्याचा पहिला दुष्परिणाम आपल्या दातांवर होतो. बर्फाच्या संपर्कात आल्याने दातांमध्ये भेगा (क्रॅक्स) पडू शकतात. विशेषत: दात आधीच कमकुवत असतील तर अचानक थंड आणि कडक बर्फामुळे दातांवरचं बाह्य आवरण (इनॅमल) कमकुवत होऊ शकतं. त्यामुळे भविष्यात दातांच्या समस्या उद्भवू शकतात. याशिवाय सतत बर्फ चघळत राहिल्यास दातांच्या नसा दुखू शकतात.

*** घसा आणि आतड्यांवर परिणाम**

तोंडात बर्फ टाकल्यावर अचानक घसा आणि आतडी थंड होतात. त्यामुळे घसा खवखवणं, खोकला किंवा डोकेदुखी होऊ शकते. बर्फामुळे घशाचे स्नायू आकुंचन पावू शकतात. आतडी अचानक थंड झाल्यामुळे पचनाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात.

*** शरीराच्या तापमानात अचानक घट**

बर्फ खाल्ल्याने शरीराचं तापमान अचानक कमी होऊ शकतं. ही स्थिती काही लोकांसाठी धोकादायक असू शकते. हृदय किंवा श्वसनाच्या समस्या असलेल्या रुग्णांना तर याचा जास्त त्रास होऊ शकतो. शरीराच्या तापमानात असंतुलन झाल्यामुळे चक्कर येणं किंवा उलट्या होणं अशी लक्षणं जाणवतात

*** डोकेदुखी आणि मायग्रेन**

बर्फ खाल्ल्याने काही लोकांना डोकेदुखी किंवा मायग्रेन होऊ शकतो. याला 'ब्रेन फ्रीझ' असेही म्हणतात. बर्फ घशात किंवा तोंडात प्रवेश करतो, तेव्हा ते मज्जातंतूंना उत्तेजित करतो. त्यामुळे तीव्र डोकेदुखी होते. ही वेदना काही मिनिटे टिकू शकते आणि संबंधित व्यक्तीला खूप अस्वस्थ वाटू शकतं.

*** त्वचेवर परिणाम**

बर्फाचा परिणाम केवळ शरीराच्या आतील भागावरच नाही, तर त्वचेवरही होतो. बर्फ थेट त्वचेवर ठवल्यावर त्वचा थंड होते. यामुळे सूज येऊ शकते. बर्फाच्या दीर्घकाळ संपर्कामुळे त्वचेवर कट किंवा फोड येऊ शकतात. त्वचा आधीच कमकुवत असलेल्यां साठी हे विशेष धोकादायक आहे.



*** सर्दी आणि फ्लूचा धोका**

उन्हाळ्यात बर्फ खाल्ल्याने सर्दी-खोकला होऊ शकतो. जास्त बर्फ खाल्ल्यास शरीराचं तापमान असंतुलित होऊ शकतं आणि शरीराची प्रतिकारशक्ती कमकुवत होऊ शकते. त्यामुळे सर्दी आणि खोकला होण्याचा धोका वाढू शकतो.

## ॲलर्जी असेल तर?

जीवनशैली

ॲलर्जी हा शब्द अनेकदा कानावर पडतो. कोणाला धुळीची ॲलर्जी असते तर कोणाला दुधाचा त्रास होतो. शेंगदाणे, सोयाबीनची ॲलर्जी असणारेही बरेचजण असतात. कोणत्याही घटकाची ॲलर्जी निर्माण होऊ शकते. आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती एखाद्या बाह्य घटकाला वेगळ्या पद्धतीने प्रतिसाद देऊ लागल्यास ॲलर्जी निर्माण होऊ शकते. धूळ, धूर, विशिष्ट प्रकारचा वास, अत्तराचा सुगंध, फळ, भाजी खाद्यपदार्थ यापैकी कशाचीही ॲलर्जी असू शकते. अर्थात अशा ॲलर्जींकडे फारसं गांभीर्याने पाहिलं जात नाही. ॲलर्जी असणारा पदार्थ किंवा घटक टाळला जातो इतकंच! त्या पलीकडे फारसं काही केलं जात नाही. ॲलर्जी जीवघेणी नसल्यामुळे लोक हे प्रकरण फार गांभीर्याने घेत नाहीत. मात्र जगभरातच ॲलर्जींचं प्रमाण वाढत चाललं आहे. त्यामुळे याकडे दुर्लक्ष करू नये, असं तज्ज्ञ डॉक्टर सांगतात. भारतातल्या २५ ते ३० टक्के लोकांना कसली ना कसली ॲलर्जी आहे. डॉक्टरांचा सल्ला घेण्याचं ॲलर्जी हे प्रमुख कारण बनू लागलं आहे. ॲलर्जी निर्माण करणाऱ्या घटकाशी संपर्क झाल्यानंतर त्वचा, श्वसनमार्ग, पचनसंस्थेचा दाह असा त्रास होऊ शकतो. ॲलर्जीची तीव्रता व्यक्तीगणिक बदलत जाते. कोणाला सौम्य स्वरुपाचा त्रास होतो तर कोणाला होणार त्रास रौद्र रुप धारण करतो. ॲलर्जीमुळे सौम्य किंवा किरकोळ स्वरुपाचा त्रास होत असला तरी तुमच्या दैनंदिन कामावर याचा परिणाम होत असतो.



प्रत्येक प्रकारच्या ॲलर्जीवर उपचार करून घ्यायला हवेत. पण त्यासाठी ॲलर्जीचं निदान होणं गरजेचं आहे. ॲलर्जीच्या निदानासाठी डॉक्टर विविध बाबी विचारात घेतात. रुग्णाचा वैद्यकीय इतिहास, कौटुंबिक इतिहास, लक्षणं, शारीरिक तपासणी, रक्ततपासणी, त्वचेची तपासणी या पद्धतींनी रुग्णाला होणाऱ्या त्रासाचं निदान केलं जातं. या चाचण्यांमुळे ॲलर्जीची नेहमी स्थिती जाणून घ्यायला मदत होते.


## जपा प्रोस्टेट ग्रंथींचं आरोग्य

जीवनशैली

पुरुषांमध्ये प्रोस्टेट ग्रंथींशी संबंधित समस्या वाढत चालल्या आहेत. प्रौढ वयात प्रोस्टेट कॅन्सरचा धोका अनेकपटींनी वाढतो. मात्र आरोग्याची काळजी घेताना या प्रोस्टेट ग्रंथींकडे आपलं दुर्लक्ष होतं. या ग्रंथींचं आरोग्य राखण्यासाठी काही आयुर्वेदिक उपाय करता येतील.

* प्रोस्टेट ग्रंथींचं आरोग्य राखण्यासाठी भरपूर पाणी पिणं गरजेचं आहे. द्रव पदार्थांच्या सेवनामुळे शरीरातला ओलावा टिकून रहातो, मलमूत्र विसर्जनाची प्रक्रिया सुलभ होते.

* आपल्या शरीराचं तापमान योग्य असणं गरजेचं आहे. शरीराचं तापमान कमी झालं तर मूत्र शरीरात साठून रहाण्याचा धोका वाढतो. याचा परिणाम प्रोस्टेट ग्रंथीवर होऊ शकतो.



* अल्होहोल आणि कॅफेनचं सेवन टाळा. या दोन घटकांमुळे शरीरात रक्तधातूचं असंतुलन निर्माण होतं. याचा परिणाम प्रोस्टेट ग्रंथींवर होतो.

* आहारात बदाम आणि आक्रोडाचा समावेश करा. यामुळे शरीरातले वात, पित्त आणि कफ हे दोष नियंत्रणात रहातात.

* गोड आणि रसाळ फळं खा. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती बळकट होते.

* बद्धकोष्ठतेमुळेही त्रास होऊ शकतो. त्यामुळे फायबरयुक्त भाज्या आणि फळांचं सेवन करा.

* नियमित अभ्यंग करा. यामुळे वातदोष कमी व्हायला मदत होईल.

* बैठं काम करणाऱ्यांनी अधूनमधून हालचाल करायला हवी. दर अर्ध्या तासाने उठून शरीर ताणण्याचे व्यायाम करावेत. यामुळे आराम मिळतो.

## सिगारेटमुळे येतं वंध्यत्व

आरोग्यविशेष
डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

तरुणाई मोठ्या प्रमाणावर सिगारेटच्या व्यसनात बुडाली आहे. सिगारेट पिणाऱ्यांना लवकर म्हातारपण येतं. सिगारेटच्या पाकिटावर कर्करोग झालेल्या व्यक्तीचं छायाचित्र छापलेलं असतं, तरी व्यसनी लोकांवर त्याचा कोणताही परिणाम होत नाही. सिगारेटमध्ये तम्बाखू असते. त्याचा धूर शरीराच्या आतील अवयवांना हानीकारक ठरतो. 'जागतिक आरोग्य संघटने'च्या मते धूम्रपानामुळे जगभरात लाखो लोकांचा मृत्यू होतो. अमेरिकेत दरवर्षी धूम्रपानामुळे सुमारे पाच लाख तरुण मृत्यूमुखी पडतात.

अमेरिकेच्या 'सेंटर फॉर डिसिज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन'च्या (सीडीसी) अहवालानुसार सिगारेट प्यायल्याने शरीराच्या प्रत्येक अवयवाचं नुकसान होतं. सिगारेटचा धूर केवळ फुप्फुस आणि हृदयालाच हानी पोहोचवत नाही, तर त्याचा दुष्परिणाम संपूर्ण शरीरावर होत असतो. दररोज अनेक सिगारेट्स ओढणाऱ्या व्यक्तंच्या शरीराची काम करण्याची क्षमता कमी होते आणि त्यांना अनेक घातक आजारांचा सामना करावा लागतो.




**काय धोके?**

सिगारेटने कर्करोग, हृदयविकार आणि स्ट्रोक यासारख्या विकारांचा धोका कैक पटीने वाढतो. सिगारेटमध्ये निकोटीन आणि टार सारखे हानिकारक केमिकल्स असतात. ते पेशींना नुकसान पोहचवतात आणि शरीराच्या सामान्य क्रियांना बाधक ठरवतात. सिगारेटचा धूर फुप्फुसांवर सर्वाधिक परिणाम करतो. त्यामुळे फुप्फुसाशी संबंधीत 'क्रॉनिक ऑब्सट्रक्टिव पल्मोनरी डिसिज' (सीओपीडी) सारखे विकार होतात आणि फप्फुसाचा कर्करोग होण्याचा धोका वाढतो. या आजारामुळे शरीराच्या श्वास घेण्याच्या क्षमतेवर वाईट परिणाम होतो. एवढंच नाही तर मधुमेहाचा धोकादेखील वाढू शकतो. सिगारेट्स ओढल्याने शरीरातील इंन्सुलिनचा प्रभाव कमी होऊ शकतो. त्यामुळे टाईप २ मधुमेह जडण्याचा धोका वाढतो.

**वंध्यत्वाची समस्या निर्माण होते**

सिगारेट्स ओढण्याचा प्रजननक्षमतेवरही वाईट परिणाम होतो. धूम्रपानामुळे महिला आणि पुरुष दोघांमध्येही वंध्यत्वाची समस्या उद्भवण्याची शक्यता असते. धूम्रपानामुळे पुरुषांचे स्पर्म काऊंट कमी होऊ शकतो आणि महिलांमध्ये हार्मोन असंतुलन होऊ शकते.



## पुरेशी झोप हवीच!

आरोग्यविशेष
डॉ. कुंदन गायकवाड

दिवसभराच्या कामाने थकल्यावर किंवा झोप आल्यावर अनेकदा आपण जांभई देतो. एखाद्याला दिवसभर वारंवार जांभई येत असेल आणि हा थकवा दूर करण्यासाठी तो अनेक कप कॉफी पित असेल, तर हा सामान्य थकवा नसून आरोग्याच्या गंभीर समस्येचं लक्षण असू शकतं. त्यामुळे काही वैज्ञानिक अहवालानुसार, वारंवार जांभई येणं हे झोपेच्या कमतरतेचं आणि झोपेच्या विकाराचं लक्षण असू शकतं.

दिवसा झोप आल्यामुळे ड्रायव्हिंग अपघात, कामाच्या चुका तर होतातच, पण त्यामुळे मानसिक समस्या आणि काही दीर्घकालीन आजार उद्भवू शकतात. ही स्थिती पुरेशी आणि चांगली झोप न मिळणाऱ्या व्यक्तींमध्ये आढळून येते. झोपेचा अभाव ही एक गंभीर आरोग्य समस्या बनली आहे. त्यामुळे दररोज अपघात आणि आरोग्य समस्या वाढत आहेत. डॉक्टरांच्या मते, वारंवार जांभई येणं हे केवळ थकव्याचे लक्षण नाही, तर शरीराला पुरेशी विश्रांती मिळत नसल्याचा हा इशारा आहे. याकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात मोठा आजार होऊ शकतो. म्हणून आजारांपासून दूर राहण्यासाठी झोपेला प्राधान्य द्या.

**वारंवार जांभई येण्याचं कारण**

* झोपेचा अभाव

* ऑब्स्ट्रक्टिव्ह स्लीप ॲपनिया किंवा नार्कोलेप्सीसारखे झोपेचे विकार

* ताण आणि नैराश्य

* औषधांचे दुष्परिणाम

* अयोग्य जीवनशैली आणि रात्री उशिरापर्यंतचा स्क्रीन टाइम

**आरोग्यास कोणते धोके निर्माणी होऊ शकतात?**

* मानसिक थकवा आणि लक्ष केंद्रित करण्यातील समस्या

* गाडी चालवताना अपघातांचा धोका वाढतो

* कामाच्या ठिकाणी चुका होणं

* नैराश्य आणि आत्महत्येचे विचार

* चिडचिडेपणा आणि चिंता यात वाढ ही समस्या कशी टाळायची?

* दररोज किमान ७-८ तास झोप घ्या.

* नियमित झोपण्याची आणि उठण्याची वेळ ठेवा.

## चिकनने वाढतोय कर्करोगाचा धोका

जीवनशैली
डॉ. सतीश सोनवणे

आरोग्यासाठी शाकाहार योग्य की मांसाहार, असा प्रश्न नेहमी विचारला जातो. काहींच्या मते मानवासाठी वनस्पतीआधारित पदार्थ योग्य, तर काहींच्या मते लोह आणि प्रथिनांसाठी मांसाहार गरजेचा आहे. या विषयावर बरंच संशोधनही झालं आहे. आता परंतु नुकत्याच झालेल्या एका अभ्यासाने दररोज चिकन खाणाऱ्यांची चिंता वाढवली आहे. या संशोधनाच्या निष्कर्षांमध्ये सुदृढ शरीरासाठी संतुलित आहार घेण्याबाबत सुचवण्यात आलं आहे. त्याचबरोबर रोज चिकन खाणाऱ्यांना गंभीर इशरा देण्यात आला आहे. इटलीतील 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ गॅस्ट्रोएन्टरॉलॉजी' या संस्थेने हे संशोधन केलं असून येथील संशोधकांच्या मते, जास्त चिकन खाणं आरोग्यासाठी धोकादायक आहे. आठवड्यात ३०० ग्रॅमपेक्षा जास्त चिकन खाणाऱ्या व्यक्तींना पोट आणि आतड्यांशी संबंधित आजार आणि कर्करोगाचा धोका संभवू शकतो. आत्तापर्यंत चिकन खाल्ल्याने शरीराला आवश्यक प्रोटीन्स तर मिळतातच पण त्यात कर्बोदके आणि चरबीचं प्रमाण कमी असल्यामुळे त्याचा आरोग्याला धोकाही नसतो त्यापेक्षा लाल मांस टाळावे, असा समज होता; परंतु या अभ्यासानंतर हा समज खोटा ठरला आहे.

पचनसंस्थेचा कर्करोग होण्याची शक्यता जास्त चिकन खाल्ल्याने 'गॅस्ट्रोइंटेस्टाइनल कॅन्सर' म्हणजेच पचनसंस्थेचा कर्करोग होण्याचा धोका वाढतो, असं संशोधकांना आढळून आलं. या संशोधनात त्यांनी २० वर्षांच्या कालावधीत ४,८६९ प्रौढांच्या डेटाचा अभ्यास केला आणि त्यातून जास्त चिकन खाणाऱ्यांना अकाली मृत्यूचा धोका जास्त असतो, असा निष्कर्ष निघाला. अर्थात समस्या कोंबडीच्या गुणवत्तेत आहे, की शिजवण्याच्या पद्धतीमध्ये, हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. 'न्यूट्रिएंट्स जर्नल'मध्ये प्रसिद्ध झालेल्या या अहवालात तज्ज्ञांनी चिकन खाण्याबाबत काळजी घेण्यास सांगितलं आहे.



**मांसाहार करणाऱ्यांनी काय करावे?**

चिकन कमी खा. चिकन चांगल्या आणि आरोग्यदायी पद्धतीने शिजवा. प्रक्रिया केलेलं मांस किंवा तळलेलं चिकन टाळा.

नवसंशोधन

### भारतीय घेतात कमी झोप

बहुसंख्य भारतीय अपुरी झोप घेत असल्याचं एका संशोधनातून समोर आलं आहे. यामागे बरीच कारणं आहेत. अपुऱ्या झोपेच्या बाबतीत भारतीयांचा दुसरा क्रमांक लागत असल्याचं हा अभ्यास सांगतो. या यादीत भारतापुढे फक्त जपान आहे. भारतीय सरासरी सात तास आणि एक मिनिट झोपतात तर जपानी लोकांचा निद्रेचा कालावधी सरासरी सहा तास ४७ मिनिटं आहे. युरोपमधले लोक आठ ते नऊ तासांची झोप घेतात. त्या तुलनेत आपण मागेच असल्याचं हा अभ्यास सांगतो.



दंतारोग्य

### दातांकडे दुर्लक्ष नको!

दातांच्या आरोग्याकडे आपलं नेहमीच दुर्लक्ष होत असतं. बरेचजण दिवसातून एकदाच दात घासतात. पण आपल्या सर्वांगिण आरोग्याची काळजी घेताना दातांना विसरून चालणार नाही. त्यातच भारतात मधुमेहाचं प्रमाण वाढत चालल्यामुळे दातांना जपायला हवं. मधुमेह आणि हिरड्यांच्या विकारांचा जवळचा संबंध असल्याचं तज्ज्ञ सांगतात. दातांचं आरोग्य राखलं तरच आपलं सर्वांगिण आरोग्य उत्तम राहील हे लक्षात ठेवायला हवं.



डोळ्यांचे आरोग्य

### धुरापासून डोळ्यांचा बचाव

धुकं आणि धूर ही सध्याच्या काळातली वाढती समस्या आहे. धुराशी सतत संपर्क आल्यामुळे डोळ्यांचं आरोग्य धोक्यात येतं. म्हणूनच डोळ्यांची विशेष काळजी घ्यायला हवी. बाहेरून आल्यानंतर डोळे गार पाण्याने धुवून घ्या. डोळ्यांना आराम देण्यासाठी सातत्याने डोळ्यांची उघडझाप करत रहा. कॉम्प्युटर किंवा मोबाईलचा वापर करताना डोळ्यांची उघडझाप महत्त्वाची ठरते. प्रदूषित कारणांपासून डोळ्यांचं रक्षण करण्यासाठी बाहेर जाताना मोठ्या आकाराचा चष्मा घाला.



आजीबाईचा बटवा

### लाभ सीताफळाचे

सीताफळ हे अत्यंत आरोग्यदायी असं फळ आहे. सीताफळात 'अ' आणि 'क' जीवनसत्त्व असतं. शिवाय पोटॅशियम, मॅग्नेशियम सारखे घटकही असतात. वजन वाढण्याच्या भीतीमुळे बरेचजण सीताफळ खात नाहीत. मात्र प्रत्यक्षात सीताफळामुळे पचनशक्ती सुधारते. पोटफुगीचा त्रास कमी होतो. अल्सरवरही हे फळ प्रभावी ठरू शकतं. आम्लपित्ताचा त्रासही सीताफळामुळे कमी होऊ शकतो. सीताफळ हे बी कॉम्प्लेक्स आणि त्यातही बी ६ या जीवनसत्त्वाचा प्रमुख स्रोत आहे. त्यामुळे हंगामात सीताफळ खायला हवं.



# एकाकीपण ते मानवी मनाचा ठाव घेणाऱ्या साहित्य प्रवासातून नगरकर झाले मंत्रमुग्ध

### लेखिका प्रियांका कर्णिक यांच्या साहित्य प्रवासाने जिल्हा वाचनालयाच्या व्याख्यानमालेची सांगता



अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित वसंत व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफतांना माझी साहित्यिक वाटचाल या विषयावर लेखिका प्रियांका कर्णिक यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. (छाया : सुरेश मैड)

नगर – सांसारिक जबाबदाऱ्या पेलताना अवतीभवती असणारे मुलांचे विश्व जेव्हा त्यांच्या स्वतःच्या भाव विश्वात गुंतते तेव्हा घरातील गृहिणीला अधिक रिकामेपण जाणवायला लागते. या रिकामेपणातून आपण पहिल्यांदा मुलांसाठी लिखाण करताना मिळालेले प्रोत्साहन हे भविष्यातील माझ्या साहित्य विषयाला गवसणी घालणारा मैलाचा दगड ठरला, असे प्रतिपादन लेखिका सौ. प्रियांका कर्णिक यांनी व्यक्त केले.

स्वतःच्या वाट्याला आलेला एकटेपणा व त्याचाच धागा पकडून स्त्री मनाचा ठाव घेणाऱ्या प्रियंका कर्णिक यांच्या साहित्य प्रवासातून उपस्थित नगरकर थक्क झाले.

अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित वसंत व्याख्यानमालेचे तिसरे व शेवटचे पुष्प गुंफतांना 'माझी साहित्यिक वाटचाल' या विषयावर त्यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, संचालिका प्रा.ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, किरण आगरवाल, ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल उपस्थित होते.

लेखिका प्रियांका कर्णिक यांनी आपल्या साहित्य प्रवासाबद्दल अनेक घटना व्यक्ती भावभावना यांचे संदर्भ दिले. आपल्याला आलेल्या तत्कालीन एकाकीपणाला धरून न बसता मी पण हळवे या ललित लेखन रुपी पुस्तकातून साहित्याला प्रारंभ झाला. ही साहित्यकृती वाचकांना खूपच पसंतीस उतरली स्त्रीच्या भावभावनांचा अविष्कार यातून हे पुस्तक त्यातील पात्र आपले वाटून गेले. यामधून मिळालेल्या प्रोत्साहातून पुढे सावल्या या स्त्री जीवनाचा ठाव घेणाऱ्या पुस्तकाची निर्मिती झाली. स्त्री कितीही शिकली स्वावलंबी झाली तरी तिचे असुरक्षिततेचे भय मात्र संपत नाही. या पुस्तकांमध्ये वरवर लिखाण न करता चित्रकार, इंजिनिअर, उर्वी यासारखी पात्र साकारताना प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन त्यांचे जीवन समरसून अनुभवले, जगले व लिखाणात साकारले. त्यामुळे सावल्या साहित्यकृती लोकप्रिय ठरली व वाचकाना अचंबित करणारी ठरली अशा त्या म्हणाल्या

पुरुषांची जीवन जगताना होणारे घुसमट, दुहेरी भूमिका, मूल्यांचे पायी तुडवले जाणे, यासारख्या असंख्य गोष्टी शेखर या नायकाच्या पात्राच्या माध्यमातून मोक्ष या पुस्तकातून मधून साकारताना एक वेगळ्याच विषयाची धाटणी मला साकारता आली. या सर्व साहित्यावर सुधीर गाडगीळ, साहित्य परिषदेचे अध्यक्ष मिलिंद जोशी यांनी केलेले साहित्य कलाकृतीचे परीक्षण, त्यावरील भाष्य व प्रोत्साहन यामुळे पुढील साहित्य वाटचालीस बळ मिळाले. भवचक्र हे आपल्या साहित्य विश्वातील मैलाचा दगड ठरलेल्या कादंबरीचा त्यामधील ५०० ते ६०० वर्षांचा प्रवास खूप वास्तववादीपणे मांडताना वाचक हे हेलावले. गोव्यातील धर्मांतरण आणि त्यातून झालेले अत्याचार याविषयी हतबद्ध या कथेपासून याला प्रारंभ झाला. हाच धागा विस्तृतपणे साकारताना तत्कालीन समाजाची झालेली परवड, अन्याय त्यांचे स्थलांतर हा मूर्तीच्या प्रतीकात्मक स्वरूपात साकारता आला. छत्रपती शिवरायांनी आपल्या कुशाग्र रणनीतीतून पुढे आपला हा समाज सावरला असे सांगून हे कादंबरी वाचकांच्या हृदयाला हात घालणारी ठरली याचे समाधान आपल्याला वाटते अशा त्या म्हणाल्या.

रिकाम्यापणातून सुरू झालेल्या हा साहित्य प्रवास असाच रसिक वाचकांना वेगळ्या व संवेदनशील विश्वात घेऊन जाण्याचा माझा प्रयत्न आहे. नगर जिल्हा वाचनालयाने मला येथे बोलावून जे प्रोत्साहन दिले हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय दिवस आहे अशा त्या शेवटी म्हणाल्या. प्रास्ताविक व सत्कार अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक यांनी केला. परिचय संचालिका शिल्पा रसाळ, सूत्रसंचालन व आभार प्रा ज्योती कुलकर्णी यांनी मानले. वसंत व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी वाचनालयाचे सर्व संचालक मंडळ, सभासद, सदस्य, कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.


## तुमच्या गुंतवणुकीला गुणवत्तेची जोड द्या

आपल्या दैनंदिन जीवनात आपण सहजच गुणवत्तेला प्राधान्य देतो. आपली कपड्यांची निवड असो की खाण्याचा पर्याय किंवा कोणत्या सेवा पुरवणाऱ्या कंपनीवर विश्वास ठेवायचा हा निर्णय असो. तर मग गुंतवणुकीचा मुद्दा आल्यावर तडजोड का करायची? भारतातल्या सतत सुधारणाऱ्या आर्थिक वातावरणात तुमच्या म्युच्युअल फंड निवड करण्याच्या प्रक्रियेत गुणवत्ता हा सर्वाधिक महत्त्वाचा निकष असला पाहिजे.

ज्याप्रमाणे आपण आरोगी किंवा शिक्षण या बाबतीत तडजोड करत नाही त्याप्रमाणे गुंतवणुकींच्या बाबतीतही करता कामा नये. उच्च गुणवत्ता असलेल्या कंपन्यांचे अनेक महत्त्वाचे विशेष समान असतात. त्यांच्या ग्राहकांची निष्ठा दृढ आणि सखोल असते, ज्यातून त्यांना बाजारात आघाडीवर राहणे शक्य होते. आर्थिक निकष विचारात घेतले तर त्या शेअर धारकांना आणि भांडवली गुंतवणुकीवर मोठा परतावा देतात, त्यांचे कर्ज अत्यल्प असते आणि रोखीची उपलब्धता चांगली असते. अशा कंपन्यांना टिकाऊ स्वरूपाची स्पर्धात्मक क्षमता मिळते. महत्त्वाचे



प्रीतम गुगळे

म्हणजे अशा कंपन्या आपल्या नफ्याचा काही भाग सतत पुन्हा व्यवसायात गुंतवतात आणि भांडवलाचे उत्तम नियोजन करून दीर्घकालीन वृद्धी आणि मूल्यनिर्मिती करतात.

आज घडीला शेअर बाजार भू-राजकीय तणावामुळे प्रभावित आहे आणि त्याचा परिणाम कंपन्यांच्या उत्पन्नावर होऊन बाजारमूल्यावर मर्यादा आल्या आहेत. गुणवत्ता तत्त्वावर काम करणाऱ्या कंपन्यांची कामगिरी बाजाराच्या कामगिरीपेक्षा कमी होती परंतु सध्याच्या वादळी चढ उताराच्या वातावरणात या कंपन्या त्यांच्या भक्कम आर्थिक ताकदीमुळे आणि विश्वासार्ह नफा क्षमतेमुळे इतरांपेक्षा चांगली कामगिरी करतील.

गुंतवणूक करताना परतावा किती मिळेल यापेक्षा कंपनी ची गुणवत्ता तपासणे मनःशांतीच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्यामुळे आत्ता सारख्या अनिश्चित वातावरणात आर्थिकदृष्ट्या मजबूत, आणि उत्तम व्यवस्थापन असलेल्या कंपन्यांच्या शेअर मध्ये गुंतवणूक करणारा म्युच्युअल फंड उत्तम कामगिरी करू शकतो.

आहिल्यानगर येथील म्युच्युअल फंड वितरक प्रीतम प्रकाश गुगळे म्हणाले की या दृष्टिकोनातून केलेल्या गुंतवणुकीचा लाभ मिळवू इच्छिणाऱ्या गुंतवणूकदारांनी आयसीआयसीआय प्रुडेंशियल क्वालिटी फंड चा अवश्य विचार करावा. ही एक कायम चालू राहणारी (ओपन एंडेड ) योजना आहे आणि त्यातील निधि रास्त भावात उपलब्ध गुणवत्ता आधारित शेअर मध्ये गुंतवला जाईल. ही योजना २० मे २०२५ पर्यंत खुली आहे आणि तुमच्या गुंतवणुकीला भक्कम स्थितीतील कंपन्यांच्या शेअर मधील सहभागाची जोड देण्याची ही एक योग्य वेळी आलेली संधी आहे.


# ३ अल्पवयीन मुलींना पळवून नेवून अश्लील कृत्य करणाऱ्या आरोपीला चार वर्ष सक्तमजुरीची शिक्षा व दंड

नगर – चाईल्ड लाईन संस्थेचा कर्मचारी असल्याची बतावणी करुन तीन अल्पवयीन मुलींना पळवून त्यांच्याशी अश्लील कृत्य केल्याप्रकरणी उंबरे (ता. राहुरी) येथील सोमनाथ उर्फ ऋषीकेश एकनाथ हापसे (वय ३२) याला दोषी धरून विशेष जिल्हा न्यायाधीश श्रीमती माधुरी मोरे यांनी चार वर्ष सक्त मजुरी व तीन हजार दंड अशी शिक्षा सुनावली. विशेष सरकारी वकील मनिषा केळगंद्रे-शिंदे यांनी खटल्याचे काम पाहिले.

१३ सप्टेंबर २०२३ रोजी तीन अल्पवयीन मैत्रिणी या शाळेत जातो म्हणून घरातून गेल्या व बेपत्ता झाल्या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास सुरू असताना तोफखाना पोलिसांना सदर तीनही अल्पवयीन पिडीत मुली या हैद्राबाद येथे असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी हैद्राबाद येथे जाऊन तीनही अल्पवयीन पिडीत मुली ताब्यात घेतल्या. तीनही अल्पवयीन पिडीत मुलींचा पोलिसांनी जबाब नोंदविला. त्या आधी सिद्धीबाग येथे थांबल्या. तेथून इतर मित्रांसमवेत डोंगरगण येथे गेल्या. संध्याकाळच्या सुमारास मित्रांनी त्यांना पुन्हा सिध्दीबाग येथे सोडले. मात्र उशीर झाल्याने घरचे रागावतील म्हणून त्या घरी न जाता सिद्धीबाग परिसरात थांबल्या. त्या सिध्दीबाग बाहेरील रस्त्यावर फिरत असताना अप्पु हत्ती चौक येथे आरोपी सोमनाथ उर्फ ऋषीकेश एकनाथ हापसे हा त्याची गाडी घेऊन आला. तुम्ही कोण आहात, एवढ्या उशिरा काय करत आहात पोलिसांना फोन लावू का? मी चाईल्ड लाईनचे काम करतो, मी तुम्हाला मदत करतो, असे म्हणून त्यांना गाडीत बसायला सांगितले. त्याने पिडीत मुलींना रात्री बाराच्या सुमारास त्याच्या रुमवर नेले. त्यावेळी आरोपीने दोन मुलीशी अश्लिल वर्तन केले. तसेच एका मुलीसोबत तिचे इच्छेविरुध्द शाररिक संबंध केले. दुसऱ्या दिवशी तिनही पिडीत मुली यांनी आंम्हाला हैद्राबादला नातेवाईकांकडे जायचे असल्याचे सांगितल्याने आरोपीने त्यांना रेल्वे स्टेशनवर सोडले. त्यानंतर तीनही मुली हैद्राबादला गेल्या, असे त्यांनी जबाबात सांगितले होते.

त्यानुसार तोफखाना पोलिसांनी आरोपीस अटक केली. उपनिरिक्षक पुनम श्रीवास्तव यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या खटल्यामध्ये सरकार पक्षातर्फे ११ साक्षीदार तपासण्यात आले. तीन पिडीत मुली पैकी एक मुलगी उलट तपासणीमध्ये फितुर झालेली होती. मात्र, आरोपीने यापूर्वी देखील फसवणुकीचा गुन्हा केलेला आहे व त्यात त्याला शिक्षा झालेली आहे, असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला. त्यानंतर न्यायालयाने शिक्षा ठोठावली.

# प्लॉट खरेदी व्यवहारात धनादेश न वटल्याप्रकरणी बिल्डरला ३ महिन्यांचा कारावास व १३ लाख नुकसान भरपाईची शिक्षा

नगर – प्लॉट खरेदीच्या व्यवहारात दिलेला धनादेश न वटता परत आल्याने शहरातील बिल्डरला तीन महिन्यांचा कारावास व १३ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याची शिक्षा न्यायालयाने सुनावली आहे.

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी या न्यायालयाने राजनंदिनी डेव्हलपर्स बिल्डर्स अॅण्ड कन्स्ट्रक्शनचे प्रो.प्रा. राहुल मच्छिंद्र ससाणे, रा. कोर्ट गल्ली, नालेगाव, अहिल्यानगर यास निगोशिएबल इंस्ट्रुमेंट अॅक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून तीन महिन्यांचा सश्रम कारावास व रक्कम रूपये १३,००,००० /- रूपये नुकसान भरपाईची शिक्षा ठोठावली आहे. नुकसान भरपाईची रक्कम एक महिन्यात न भरल्यास तीन महिने सश्रम करावास भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी यांना देण्याचा आदेश दिलेला आहे.

राहुल ससाणे यांनी स्मिता राहुल काची उर्फ स्मिता राठोड यांच्याकडून सन २०२१ मध्ये प्लॉट खरेदी केला होता. प्लॉट खरेदी व्यवहारापोटी दिलेला धनादेश वटला नाही. त्यामूळे ससाणे यांनी पुन्हा दुसरा धनादेश दिला होता. तो धनादेश देखील अनादर झाल्याने फिर्यादी स्मिता काची यांनी राहुल ससाणे यांना वकीलांमार्फत नोटीस पाठविली परंतु ससाणे यांनी फिर्यादी धनादेशाची संपुर्ण रक्कम परत दिली नाही. त्यामुळे फिर्यादी स्मिता काची यांनी राहुल ससाणे यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. त्या खटल्यात फिर्यादी तर्फे सादर केलेला पुरावा व साक्षीदारांची साक्ष्य ग्राह्य धरून न्यायालयाने राहुल ससाणे यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. आरोपी राहुल ससाणे तर्फे घेण्यात आलेला बचाव न्यायालयाने फेटाळून लावला.

या खटल्यात फिर्यादी स्मिता राहुल काची यांचे करीता अॅड. सुहास एस. टोणे यांनी युक्तीवाद करून न्यायालयात स्मिता काची यांची बाजु मांडली. त्यांना अॅड. अमित अडागळे व अॅड. विलास ढोणे, अॅड. गौरव हरबा, अॅड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.

## जिल्ह्यात ड्रोन, मानवरहित हवाई यंत्र उडवण्यास मनाई

नगर – जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्ह्याच्या हद्दीत कोणत्याही व्यक्तीस ड्रोन किंवा इतर मानवरहित हवाई यंत्र चालवण्यास, उडविण्यास किंवा वापरण्यास मनाई आदेश जारी केले आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यावर कायद्यान्वये कारवाई करण्यात येईल. हे आदेश ३ जुन २०२५ पर्यंत लागू राहणार असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.


अहमदनगर छावनी परिषद,
एमएक्स चौक, कैम्प भिंगार
अहमदनगर -४१४००२.

Ahmednagar Cantonment Board,
AMX Chowk, Camp,
Ahmednagar -414002.

दुरभाष सं./Phone No.:- 0241-2326008
फॅक्स सं./Fax No. :- 0241-2340739
ई - मेल./e-mail:-ahmedngrcantt@gmail.com
वेब साईट/Website: https://ahmednagar.cantt.gov.in

## जाहीर नोटीस

छावनी परिषद हद्दी मध्ये सदर बाजार / भिंगार / बंगलो एरिया मध्ये राहणाऱ्या सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, आपले पडलेले घर / पडलेली इमारत / पडलेले वाडे व पडायला झालेले घर, भिंत, इमारत असतील किंवा मातीचे ढिगारे असतील ते ३० दिवसाच्या आत काढून घेणे अथवा उतरुन घेणे जरुरीचे आहे. जर काही वित्त व जिवीत हानी झाल्यास त्यास छावनी परिषद जबाबदार राहणार नाही. ज्या नागरिकाना घर रिपेरिंग अथवा नविन बांधकाम करावयाचे असतील तर त्यांनी छावनी परिषदेची परवानगी घ्यावी. याची सर्व छावनी परिषद क्षेत्रातील नागरिकांनी नोंद घ्यावी.

पत्र क्र. अह / धोकादायक इमारत. / २०२५-२०२६
छावनी परिषद कार्यालय अहमदनगर
दिनांक. १६-०५-२०२५

(विक्रांत मोरे)
मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद,


# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी निमित्त अहिल्यानगरमध्ये ३१ मे पर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन

### शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने १९ मे रोजी तिरंगा रॅली : अॅड. अभय आगरकर



शहर भाजपाच्या बैठकीत नूतन मंडल अध्यक्षांचा सत्कार करताना शहर जिल्हाध्यक्ष अॅड. अभय आगरकर.

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी निमित्त अहिल्यानगर शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ३१ मेपर्यंत चालणाऱ्या कार्यक्रमांमध्ये जनजागृती, कार्यशाळा, तज्ज्ञ वक्त्यांची व्याख्याने, निबंध, चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे महान कार्य नव्या पिढीपर्यंत न्यायचे आहे. नुकताच भारताच्या शूर सैनिकांनी ऑपरेशन सिंदूर यशस्वी केले आहे. त्यामुळेच सैनिकांप्रती आदर व्यक्त करून त्यांचे अभिनंदन करण्यासाठी शहर भाजपाच्या वतीने १९ मे रोजी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीतही सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन शहर जिल्हाध्यक्ष अॅड. अभय आगरकर यांनी केले आहे.

शहर पदाधिकाऱ्यांची शनिवारी झालेल्या बैठक्त अध्यक्षस्थानाहून अॅड. आगरकर बोलत होते. यावेळी सुनील रामदासी, सरचिटणीस प्रशांत मुथा, महिला जिल्हाध्यक्षा प्रिया जानवे व पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत सावेडी मंडल अध्यक्ष ज्ञानेश्वर काळे, भिंगार मंडल अध्यक्ष सचिन जाधव, केडगाव मंडल अध्यक्ष भरत ठुबे, मध्य मंडल अध्यक्ष मयूर बोचूघोळ यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

सिए ज्ञानेश्वर काळे म्हणाले की, १९ मे रोजी होणाऱ्या तिरंगा रॅलीच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी व सैनिकी अधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येणार आहे. ऑपरेशन सिंदूरबद्दल विरोधक वावड्या उठवत आहेत. त्यांना या रॅलीच्या माध्यमातून उत्तर दिले जाईल. हम सेना के साथ, हम मोदी के साथ असे या रॅलीचे घोषवाक्य आहे. सर्व नागरिकांनी या रॅलीत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रिया जानवे यांनी महिला आघाडीच्या वतीने २५ मे रोजी होणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. बैठकीचे प्रास्ताविक प्रशांत मुथा यांनी केले. यावेळी बाबासाहेब सानप, बाळासाहेब भुजबळ, अनिल निकम, बाळासाहेब गायकवाड, सचिन पळशीकर, प्रकाश जोशी, देवेंद्र बंब, अविनाश वाणी, ज्ञानेश्वर धिरडे, दत्ता गाडळकर, सुधीर मंगलारप, गोपाल वर्मा, राखी आहेर, कालिंदी केसकर, मयूर ताठे, अरुण शिंदे, कैलास गर्जे, राजेंद्र फुलारे, सचिन कुसळकर, सुनील तावरे, सुहास पाथरकर, सुजित खरमाळे, सविता कोटा, संतोष शिरसाठ, रोहित पठारे, संपत नलावडे, रामदास आंधळे, बंटी डापसे, अविनाश साखला, अमोल निस्ताने, ओंकार लेंडकर, आकाश सोनवणे, विशाल कर्डिले, राजेंद्र सातपुते, वैभव जोशी, सचिन जाधव, सागर शिंदे, विक्रम शिंदे, सचिन पावल, अनिल पाचपुते, डॉ. करमाळकर, अनिल ढवण, पल्लवी जाधव आदी उपस्थित होते.


## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर

मुख्य कार्यालय :- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता. नगर कार्यालयाशेजारी, अहमदनगर. फोन २३२६९१४

जा.क्र. पतसंस्था फेडरेशन / ९०५ / सन २०२५ दिनांक :- १७/०५/२०२५

### स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहीरनामा

ज्या अर्थी, **ओम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., भिंगार, ता.जि. अ.नगर** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुद्ध महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असून त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे. तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उप-निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर. यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरून मी **एम. ए. शेख** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जाहीर लिलावाने विक्री करीत आहे. तरी स्थावर मालमत्ता लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी नमुद ठिकाणी तारखेस व वेळेस उपस्थित रहावे.

| अ.नं. | थकबाकीदाराचे नाव | गांव | स्थावर मिळकत | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वसुली दा रक्कम | गट नं. | क्षेत्र हे आर | आकार रु पै | वसुली दा. रक्कम | | | |
| | | | | | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | कर्ज - यासीन नासर अरब यांची मिळकत<br>जामि - निलेश पोपट दळवी<br>जामि - प्रताप भिमाजी निमसे<br>जामि - जैनुद्दीन अब्दुल करीम पठाण | केडगाव ता. नगर | ३५७६०१/- + होणारे व्याज + इतर खर्च | ५१/३/१/ फ्लॉट / ८/९/१०/१ | १.०१.२५ | १०.१३ | मुळ नकाशाप्रमाणे | | | |
| २ | कर्ज - अमर दिनकर जगताप यांची मिळकत<br>जामि - यासीन नासर अरब<br>जामि - नासर महंमद अरब<br>जामि - रविंद्र ज्ञानदेव गायके<br>जामि - सिमा जनार्धन रोहकले | केडगाव ता. नगर | ४६००३०/- + होणारे व्याज + इतर खर्च | २८९/१/ प्लॉट नं. ९ / १०/११/५ पैकी | ०.५४.७९ पैकी | ५.४८ | | | | |

लिलावाचे ठिकाण व वेळ : https://eauction.gov.in या सांकेतिक स्थळावर (**ओम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., भिंगार, ता.जि. अ.नगर**). **दि. १७/०६/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता.** हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल, याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

**लिलावाच्या दिवशी दि. १७/०६/२०२५** रोजी लिलावात कोणीही भाग न घेतल्यास **फेर लिलाव नं. २ दि. १८/०७/२०२५ रोजी सकाळी : ११.३० वाजता** संस्थेच्या कार्यालयात होईल. तसेच या ही लिलावात बोली बोलण्यास अथवा योग्य किमंत न आल्यास **अंतिम लिलाव हा दि. १९/०८/२०२५ रोजी सकाळी : ११.३० वाजता** https://eauction.gov.in या सांकेतिक स्थळावर (**ओम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., भिंगार, ता.जि. अ.नगर**) या ठिकाणी होईल याची नोंद घ्यावी.

स्थळ :- अहमदनगर
दिनांक :- १७/०५/२०२५

(एम. ए. शेख)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर



## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक/मुळ सभासद **शेख मोहसीन गफुर** रा. ब्लॉक नं. बी ५ शितल हौसिंग सोसायटी, अहमदनगर यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण,दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा तुकडी अहिल्यानगर / अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहिल्यानगर / अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे भिंगार** येथील मे.दु. निबंधक साहेब, अहिल्यानगर / अहमदनगर यांचे कक्षेतील मनिषा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत, अहिल्यानगर / अहमदनगर मधील प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| स. नं. | प्लॉट नं. | चौ. मी. |
|---|---|---|
| ३४७ / २ब | ८ | ३२८.३८ |

सदर प्लॉट मध्ये मंजुर प्लॅन प्रमाणे लोडबेरींगमध्ये बांधकाम झालेल्या मनिषा रो हौसिंग सोसायटी मधील विद्यमान मालक यांचे मालकीचा रो हौसिंग ब्लॉक नं. ४६ असुन याचे प्लॉटचे क्षेत्र ३७- १७ चौ.मी. असुन तळ मजल्यावर एक हॉल, एक रुम, एक किचन रुम, संडास बाथरुम असे बांधकाम झालेले असुन सदर तळमजल्यावरील बांधकामाचे क्षेत्र २३.२३ चौ. मी. मिळकतीबाबत.

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस - रोहाऊस ब्लॉक नं.८१ दक्षिणेस - रोहाऊस ब्लॉक नं.४५
पश्चिमेस - अंतर्गत रस्ता उत्तरेस - रोहाऊस ब्लॉक नं.४७

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. १७/०५/२०२५.
अहमदनगर.

**अॅड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**अॅड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **श्री शिवाजी सुदाम उकांडे रा. दत्त कॉलनी, बुऱ्हानगर** यांचे मालकी व वहिवाटीची आहे. सदरील मिळकत आज रोजी निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा देऊन ती आमचे अशिलांस खरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. आमचे अशिल हा खरेदी व्यवहार लवकरच पूर्ण करण्याचे विचारात आहेत. तत्पुर्वी या मिळकतीची विद्यमान मालकांची मालकी व मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खातरजमा करून घेण्याच्या उद्देशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. सबब ज्या कोणाचीही कसलाही कायदेशीर अधिकार, हक्क, अथवा हितसंबंध या मिळकतीत असतील अशाने ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले दिवसांपासुन ७ दिवसांचे आत त्याचे या मिळकतीशी असणाऱ्या हितसंबंधाच्या कागदोपत्री पुराव्यानिशी खाली सही करणाऱ्यांकडे समक्ष भेटुन त्याची खातरजमा करून घ्यावी व या व्यवहारास लेखी हरकत घ्यावी. या मुदतीत जर कोणाचीही हरकत आली नाही तर ही मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राहय धरून आमचे अशिल त्याचा खरेदी व्यवहार पुर्ण करेल व मग कोणाचीही हरकत ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :-** जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो. तु. ता. नगर पैकी अहिल्यानगर येथील अहिल्यानगर जिल्हा परिषद पैकी ग्रामपंचायत मौजे **भिंगार** येथील मे. दुय्यम निबंधक साहेब, अ.नगर यांचे कक्षेतील खालील तपशीलाची मिळकत

| सर्व्हे/गट नं. | प्लॉट नंबर | चौ.मी. |
|---|---|---|
| २७७/१अ २ | १३ | १७५.०० |

यापैकी विद्यमान मालकाचे ५९.९४ चौमी क्षेत्र आमचे अशिलांस खरेदी देणेचे ठरले आहे.

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस - युनिट नं. २ दक्षिणेस - प्लॉट नं. १४
पश्चिमेस - युनिट नं. ४ उत्तरेस - ४.५० मीटर रुंदीचा रस्ता

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वकची मिळकत. नोटीस दिली

दि. १७/०५/२०२५
अहमदनगर.

**अॅड. शुभांगी जाधव**
पत्ता- तपोवन रोड, अहिल्यानगर
मो. ९८३४४३७७६७


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

